follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।



शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले...
कडब्याचा दर दोन ते अडीच हजार रुपये

वृत्त पान ५ वर...

⁂ RNI Regd. No. 72105/99 ⁂ वर्ष २५ ⁂ अंक २२४ ⁂ सातारा ⁂ सोमवार, दि. २२ एप्रिल २०२४ ⁂ पाने ६ (सुप्रभात) ⁂ किंमत ५/– रूपये

# गुटखा न दिल्याने मुलाचा डोक्यात दगड घालून खून

## कराड तालुका हादरला; सलग दोन दिवसांत दोन खून

**राजदंड / कराड**

**गुटखा दिला नाही म्हणून चिडून जाऊन एकाने १४ वर्षीय मुलाच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केल्याची भयानक घटना मुंढे (ता. कराड) गावच्या हद्दीत घडली आहे. ही घटना रविवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास घडली. सलग दोन दिवसात कराड तालुक्यात खुनाच्या दोन घटना घडल्याने तालुका हादरला आहे. शनिवारी विजयनगर (ता. कराड) येथे खुनाची घटना घडली होती.**

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, मुंढे येथील कमानीसमोर रविवारी दुपारी १४ वर्षीय मुलगा व आरोपी यांच्यात गुटखा न दिल्याच्या कारणावरून वाद झाला होता, असे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. वादानंतर रागाच्या भरात आरोपीने मुलाला दगड मारला आणि तो दगड डोक्यात लागला. डोक्यात दगड लागल्याने त्याला गंभीर इजा झाली आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला असल्याची माहिती समजली आहे.

खुनाच्या घटनास्थळी कराडचे डीवायएसपी अमोल ठाकूर, कराड शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंडीराम पाटील, स्थानिक गुन्हे शाखा सातारांचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर, कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पतंग पाटील यांच्यासह कर्मचारी यांनी भेट दिली असून पोलीस खुनाचा अधिक तपास करत आहेत.



घटनास्थळाची पाहणी करताना कराडचे पोलीस अधिकारी व कर्मचारी.

# माढ्यात महायुतीला झटका

## ▪ उत्तमराव जानकर शरद पवार गटात दाखल

**राजदंड / अकलूज**

बारामतीसोबत आता माढ्यातील लोकसभा निवडणुकीत देखील राजकीय वातावरण तापत चाललं आहे. अशातच शरद पवार यांनी महायुतीला दोन्ही ठिकाणी मोठा झटका दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे प्रमुख नेते उत्तमराव जानकर हे शरद गटात सामील होणार आहेत. जानकर हे धनगर समाजाचे नेते असून त्यांना जनतेचा चांगला पाठिंबा असल्याचे सांगितले जाते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक जागांवर त्यांचा प्रभाव आहे. त्यामुळे आता महायुतीला याचा मोठा फटका बसणार आहे. यासोबत अजित पवारांचा पराभव केल्यानंतर पक्ष सोडणार असल्याचे उत्तमराव जानकर यांनी म्हटलं आहे.

उत्तमराव जानकर हे सोलापूर जिल्ह्यातील अनेक समर्थकांसह शरद पवार गटात सामील होणार आहेत. जानकर यांचा सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात चांगला प्रभाव आहे. अशा स्थितीत उत्तम जानकर यांनी पक्षप्रवेश केल्याने सोलापूर आणि माढा येथील भाजप उमेदवारांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. शुक्रवारी माढ्याचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील आणि उत्तमराव जानकर यांचे ३० वर्षांचे कट्टर राजकीय वैर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि हजारो कार्यकर्त्यांच्या साक्षीने संपवले. त्यानंतर बारामतीमध्ये अजित पवारांचा पराभव करुनच पक्ष सोडणार असा इशारा उत्तमराव जानकर यांनी दिला आहे. उत्तमराव जानकर हे शरद पवारांना जाऊन मिळाल्याने त्यांनी अजित पवारांविरोधात भूमिका घेतली आहे.




माढा लोकसभा मतदारसंघात धनगर समाजाचे नेते उत्तमराव जानकर यांनी शुक्रवारी निर्णायक मेळावा घेतला. जानकर यांना समर्थन देण्यासाठी हजारो समर्थक वेळापूर मध्ये जमा झाले होते. उत्तमराव जानकर यांनी बोलावलेल्या बैठकीला जयंत पाटील, धैर्यशील मोहिते पाटील, सहकार महर्षीचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील उपस्थित होते. यावेळी भाजपने आज पर्यंत फसवणूक केली आहे, अशी भावना कार्यकत्यांनी बोलून दाखवली. यासोबत जानकर समर्थकांनी कोणत्याही परिस्थितीत भाजपकडे जायचे नाही, अशी भूमिका घेतली. त्यामुळे जानकर यांनी मोहिते पाटील यांच्या पाठीमागे आपली ताकत लावत महायुतीसमोरील आव्हान वाढवलं आहे. सहा महिन्यापासून यासाठी पडद्यामागे प्लॅनिंग सुरू असल्याचा गौप्यस्फोट उत्तमराव जानकर यांनी केला आहे.

**▪ काय म्हणाले उत्तमराव जानकर?**

''बारामतीमध्ये अजित पवार यांचा पराभव करेपर्यंत मी अजित पवार गटात आहे. अजित पवारांचा पराभव करुन त्यांचा गट सोडणार आहे,'' असे उत्तमराव जानकर (पान ३ वर)

## थोडक्यात

### पोलीस असल्याची बतावणी करून वृध्दाला लुटले

**सातारा :** मी पोलीसवाला आहे. कॅनॉलजवळ एका महिलेचा खून झाला असून, ती त्याचा तपास करत आहे' असे सांगत विश्वास संपादन करुन दोघा अज्ञातांनी १ लाख ७५ हजारांचे सोने वृध्दाकडून लंपास केले. कोरेगाव ते सातारा रस्त्यावर कृष्णानगर येथील महावितरणच्या कार्यालयाजवळ दि. १९ रोजी सकाळी १०.३० वाजता हा प्रकार घडला. सातारा शहर पोलीस ठाण्यात बाळकृष्ण दगडू शेलार (वय ६४, रा. भिवडी- त्रिपुटी, ता. कोरेगाव) यांनी फिर्याद दिली आहे.

### साताऱ्यातून युवती बेपत्ता

**सातारा :** येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात गेलेली गायत्री दयानंद खुडे (वय २०, रा. अंबाबाई मंदिराजवळ, सातारा) ही बेपत्ता आहेत. याबाबत तिची आई वर्षा दयानंद खुडे (वय ४७) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस नाईक पाटोळे तपास करत आहेत.

### कारच्या धडकेत युवकाचा मृत्यू

**सातारा :** वाढेफाटा, ता. सातारा येथील आमंत्रण हॉटेलसमोर स्विफ्ट कारची (एमएच ११ डी एच १९२१) दुचाकीला (एमएच ११ सीएम ५३०८) जोरदार धडक बसली. ही घटना दि. २ मार्चला सकाळी ११.१५ वाजता घडली. यात शुभम नंदकुमार शितोळे (वय २९, रा. बनवडी, ता. कोरेगाव) याचा मृत्यू झाला.

विमल नंदकुमार शितोळे (वय ५६, रा. बनवडी, ता. कोरेगाव) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, तेजस मोहन साळुंखे (वय २६, रा. वनगळ, ता. सातारा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक अबनावे तपास करत आहेत.

# प्रवासी कर व प्रदूषण कर वसुलीचा ठेका तडकाफडकी रद्द

## मुख्याधिकारी योगेश पाटील यांचा धाडसी निर्णय

**राजदंड / महाबळेश्वर**

प्रवासी कर व प्रदूषण कर वसुलीचा बालाजी इंटरप्राईजेस, अहमदनगर या खाजगी ठेकेदारास महाबळेश्वर पालिकेने दिलेला ठेका तडकाफडकी रद्द करून ठेकेदाराकडे असलेले सर्व टोलनाके पालिकेने मध्यरात्री १२ वाजता आपल्या ताब्यात घेतले. टोल नाके ताब्यात घेतल्यानंतर आता या नाक्यावर पालिकेच्या वतीने टोल वसुली सुरू करण्यात आली आहे. पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी घेतलेल्या या धाडसी निर्णयाचे शहरातून अभिनंदन होत आहे.

महाबळेश्वर पर्यटनस्थळाला दरवर्षी साधारण २० लाख पर्यटक भेट देत असतात. पालिकेच्या वतीने पर्यटका कडुन प्रवासी कर व प्रदुषण कर वसुल केला जातो पालिकेने ३ फेब्रु २०२३ ते २ फेब्रु २०२६ या तीन वर्षां करीता कर वसुलीची जबाबदारी अहमदनगर येथील बालाजी इंटरप्राईजेस या खाजगी ठेकेदाराकडे दिली होती हा ठेका घेताना पालिका व ठेकेदारा यांच्यात एक करार करण्यात (पान ३ वर)

# जलद प्रतिसाद पथकाचे सातारा शहरात 'मॉक ड्रील'


## आपत्कालीन परिस्थितीचे थेट प्रात्यक्षिक

**राजदंड / सातारा**

सकाळी साडेदहाची वेळ.. गर्दीने गजबजलेल्या मोती चौकात नागरिकांची ये-जा सुरू होती.. दुकानदार आपल्या कामात व्यस्त होते.. इतक्यात मोर्चेकरी आले.. घोषणा देऊ लागले.. दगडफेक सुरू झाली अन् गर्दी पांगविण्यासाठी जलद प्रतिसाद पथकाला पाचारण करावे लागले.. अश्रुधुराच्या कांड्या फोडण्यात आल्या.. अचानक झालेला हा प्रकार पाहून नागरिकांमध्ये थरकाप उडाला.. मात्र, जलद प्रतिसाद पथकाचे हे प्रात्यक्षिक असल्याचे समजल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

सातारा शहर पोलिस दलात जलद प्रतिसाद पथक स्थापन करण्यात आले आहे. भारतात अत्यंत नावाजलेल्या अशा रॅपिड ॲक्शन फोर्सकडून या पथकाला आपत्कालीन परिस्थितीत गर्दीवर कशाप्रकारे नियंत्रण आणावे, वेपन हँडलिंग याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्याने शनिवारी सकाळी पोलिस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली साताऱ्यातील मोती चौकात जलद प्रतिसाद पथकाकडून जातीय दंगाकाबू योजनेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास मोती चौकातील सर्व व्यवहार नेहमीप्रमाणे सुरू (पान ३ वर)




### अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग...

**पोलिस अधीक्षक समीर शेख, अपर पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधीक्षक (गृह) अतुल सबनीस, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरुण देवकर, शाहूपुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र सावंत्रे, राखीव पोलिस निरीक्षक बाळू आलदर, रॅपिड ॲक्शन फोर्सचे पोलिस निरीक्षक राजकुमार सिंह, सहायक पोलिस निरीक्षक अभिजित यादव, तीन राखीव पोलिस उपनिरीक्षक, दहा कवायत निर्देशक, ९० पोलिस अंमलदार, तसेच पाच पोलिस वाहने, जातीय दंगा काबू योजनेच्या प्रात्यक्षिकास हजर होते.**

# भाजपकडून साताऱ्यात 'डॅमेज कंट्रोल'

## उदयनराजेंचे पोवईनाक्यावरील तैलचित्र एका रात्रीत पुसले

**राजदंड / सातारा**

सातारचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या पोवईनाक्यावरील घराबाहेरील एका भिंतीवर रेखाटल्या गेलेल्या खा. उदयनराजे भोसले यांच्या तैलचित्राचा 'इश्यू' झाल्याने हे तैलचित्र रातोरात पुसले गेले आहे. लोकसभा निवडणुकीत याचा फटका बसू नये म्हणून चित्र पुसून 'डॅमेज कंट्रोल'चा प्रयत्न भाजपने केल्याचे मानले जात आहे.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे साताऱ्यातील पोवईनाक्यावर 'कोयना दौलत' हे निवासस्थान आहे. या घराच्या बाजूलाच असलेल्या मोठ्या इमारतीच्या भिंतीवर काही महिन्यांपूर्वी खा उदयनराजे भोसले यांच्यावरील प्रेमापोटी एका चित्रकाराने त्यांचे भव्य तैलचित्र रेखाटले होते. त्या वेळेपासूनच ते तैलचित्र वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. चित्र काढतानाच त्याला पोलिसांकडून अटकाव करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र त्यावेळी दोन पावले मागे घेण्याची भूमिका शंभूराज देसाई यांना घ्यावी लागली होती. पण दररोज घरातून पाऊल बाहेर काढला की देसाई यांना ते चित्र पहावे लागत होते.

याचा हिशेब करण्याचा मोका लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने देसाई गटाने उघडपणे साधल्याचे मागील दोन-चार दिवसातील घटनांवरून स्पष्ट झाले आहे. उदयनराजे भोसले यांना भाजपकडून उमेदवारी जाहीर झाल्यापासून त्यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघ पिंजून काढण्यास सुरुवात केली. मात्र पाटण तालुक्यात त्यांनी घेतलेल्या मेळाव्यास देसाई गटाला डावलले गेल्याचे तात्कालिक निमित्त पुढे करून उदयनराजे भोसले यांना अडचणीची ठरेल अशी एक पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात (पान ३ वर)

### शेंद्रे येथे तिघांकडून युवकाला मारहाण

**राजदंड / सातारा**

शेंद्रे, ता. सातारा येथील आमराई हॉटेलच्या पार्किंगमध्ये दारूच्या नशेतील तिघांनी युवकाला मारहाण केल्याची घटना दि. १८ रोजी रात्री ११.४५ च्या सुमारास घडली आहे.

अक्षय राजेंद्र कांदेकर (वय ३५, रा. संभाजीनगर, कोडोली, ता. सातारा) याने फिर्याद दिली असून, प्रमोद कुंदक, विराज कुंदक, अक्षय लोखंडे (सर्व रा. बोरगाव, ता. सातारा) यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस हवालदार निकम तपास करत आहेत.

# जनसंवादानंतर उदयनराजेंच्या राजकीय गाठीभेटी

## रामराजे नाईक निंबाळकर व प्रभाकर घार्गे यांची घेतली भेट



खा. उदयनराजे यांनी आ. रामराजे यांची साताऱ्यात भेट घेतली.

**राजदंड / सातारा**

संपूर्ण सातारा लोकसभा मतदारसंघाची एक फेरी पूर्ण करणाऱ्या खासदार उदयनराजे भोसले यांनी शनिवारी येथील प्रीती एक्झिक्युटीव्ह हॉटेलमध्ये विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर व माजी आमदार प्रभाकर घार्गे यांची भेट घेतली. यावेळी कराड उत्तरचे नेते मनोज घोरपडे व वसंतराव मानकुंमरे हे सुद्धा उपस्थित होते. यावेळी रामराजे व उदयनराजे याची कमराबंद चर्चा झाल्याची माहिती आहे.

खासदार उदयनराजे भोसले यांनी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच सातारा जिल्ह्यातील दीड हजार ग्रामपंचायतींना भेटी देणे जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते संघटना विविध संघटनांचे पदाधिकारी यांचा (पान ३ वर)

# शिखर शिंगणापूरच्या मुंगी घाटात मानाच्या कावडीचा थरार...

- शंभू महादेवाच्या यात्रेस लाखो भाविक
- कावडी चढविताना पाहिला भक्तीशक्तीचा रोमहर्षक सोहळा




**राजदंड / दहिवडी**

संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत माण तालुक्यातील शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाच्या यात्रेत लाखो भाविकांच्या उपस्थितीत मुंगी घाटातील अभूतपूर्व सोहळा उत्साह व भावपूर्ण वातावरणात पार पडला. मुंगी घाटातून संत भुतोजीबुवा तेली यांच्या मानाच्या कावडी हरहर महादेव या जयघोषात मानवी साखळी द्वारे जोमाने चढविण्यात आल्या. आज रात्री मंदिरातील शिव-पार्वतीच्या पिंडीवर जलाभिषेक करून दहा दिवसाच्या यात्रेची सांगता झाली.

शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाच्या यात्रेला चैत्र शुक्ल पंचमीला शिव-पार्वतीच्या हळदी समारंभाने प्रारंभ झाला. लाखो वऱ्हाडी मंडळीच्या साक्षीने अष्टमीला विवाह सोहळा पार पडला.तर अष्टमीलाच शंभू महादेवाचे मुख्य मंदिर ते अमृतेश्वर मंदिराला मानाचे पागोटे बांधण्यात आले.याला ध्वज बांधण्याचा कार्यक्रम म्हणतात.

एकादशी दिवशी इंदूर राजघराण्यातील कालगावडे या राजाने घोड्यावरून येवून पारंपारिक व रीतिरिवाजाप्रमाणे दर्शन घेतले. आज शनिवार दिनांक २० रोजी चैत्र शुक्ल व्दादशी दिवशी मुंगी घाट सोहळा पार पडला. शंभूमहादेव पार्वती विवाह सोहळ्यानंतर लग्नाची वरात म्हणून प्रसिध्द असलेल्या कावडी सोहळ्यात सातारासह पुणे,सोलापूर,सांगली आदी जिल्ह्यातून कावडी ढोलताश्यांच्या निनादात वाजत गाजत नाचवत मंदिरात जात होत्या. अवघड मुंगी घाटातून कावडी चढविण्यास दुपारी दोन वाजलेपासून प्रारंभ झाला. महादेव डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या कोथळे जिल्हा सोलापूर येथे सर्व कावडींचे सोलापुर जिल्हा प्रशासनाने स्वागत केले. त्यानंतर सर्व कावडी एकामागे एक मानवी साखळीव्दारे मुंगी घाट चढून घाटमाथ्यावर आल्या. फलटण, बारामती, माळशिरस, तालुक्यासह पुरंदर तालुक्यातील सासवड बेलसर, एकतपूर, खळद, शिवरी, खानवडी, कुंभारवळण आदी ठिकाणच्या कावडी चढविण्यात आल्या. हर हर महादेव या गजरामध्ये शिवभक्तांनी मानवी साखळी व्दारे एकात्मतेचे दर्शन घडवून उत्साहात व कसरतीने कावडी वर आणल्या. (पान ३ वर)

# भूकंप

तैवानला हादरवून सोडणाऱ्या भूकंपानंतर वॉलिन सिटीमध्ये ४५ अंशांच्या कोनात रस्त्यावर ओणवी झालेल्या एका दहा-बारा मजल्यांच्या इमारतीचे छायाचित्र समोर आले तेव्हा अनेकांच्या काळजात धस्स झाले. कारण, पंचवीस वर्षांमधील सर्वांत मोठाभूकंप, रिक्टर स्केलवर ७.४ नोंद, त्सुनामीचा इशारा यानंतर जीवित व वित्तहानीची कल्पनादेखील अंगावर काटा आणणारी असते. पण, त्याचवेळी राजधानी तैपेईमधील 'तैपेई-१०१' ही सर्वाधिक उंचीची इमारत मात्र सुरक्षित राहिली. नावाप्रमाणेच १०१ मजल्यांची आणि तब्बल १६६७ फूट उंचीची ही इमारत २००४ पर्यंत जगातील सर्वाधिक गगनचुंबी इमारत म्हणून ओळखली जायची. तैपेईतील मेट्रो मार्गांनीही जागा सोडली अशा एरव्ही विध्वंसकारी ठरणाऱ्या मोठ्या भूकंपातही ही इमारत सुरक्षित राहण्याचे कारण तिच्या मध्यभागी ८७ ते ९२ व्या मजल्यापर्यंत तब्बल ६६० टन वजनांचा एक पोलादी लोलक टांगता ठेवलेला आहे. असा पेंड्यूलम मध्यभागी टांगता ठेवणे हे भूकंपशोषक बांधकामाच्या विविध तंत्रांपैकी एक तंत्र आहे. तळमजल्यावर खांब न टाकणे, संपूर्ण इमारतीची रचना शिसे व रबरापासून बनलेल्या बॉल बेअरिंगवर आधारित तरंगत्या पायावर उभी करणे, आरसीसी



बांधकाम अथवा मोठ्या इमारतींमध्ये प्रत्येक मजल्यावर धक्काशोषक असे आणखी काही उपाय आहेत. एकंदरित ताठ, मजबूत व तरीही लवचिक असे भूकंपरोधक इमारत बांधकामाचे सूत्र आहे.तैवानच्या भूकंपात शेकडो जखमी झाले असले तरी मृतांची संख्या ९ हे अशा तंत्राचे वापर व त्यातून भूकंपरोधक इमारतींचे यश आहे. बुधवारी सकाळी लोक नित्यनेमाने कामासाठी तयार होत असताना हा भूकंप झाला. त्याचे केंद्र वॉलिन प्रांतात होते व त्यापासून वॉलिन सिटी हे तिथले मुख्य शहर अवघ्या ११ मैलांवर आहे. तैपेई किंवा न्यू तैपई या राजधानीतही भूकंपाचे धक्के जाणवले. पण, काही वेळातच जनजीवन सुरळीत झाले. वाहतूक पुन्हा सुरू झाली. आई-वडील मुलामुलींना शाळेत सोडायला निघाल्याचे, नोकरदार कामावर चालल्याचे दिसले.भूकंपाची तीव्रता डोंगराळ भागात अधिक होती. रेल्वे, रस्ते डोंगररांगांमधून जातात. अनेक जण खाणींमध्ये काम करतात. डोंगराळ भागात भूकंपामुळे रस्ते व रेल्वे बोगद्यांच्या तोंडावर दरडी कोसळल्या. काही लोक खाणींमध्ये अडकले. यंत्रणेने तत्काळ त्यांची सुटका केली. वॉलिन सिटीचे महापौर तर कुबड्या घेऊन मदतकार्याचे नेतृत्व करताना दिसले. कारण, आधीच्या भूकंपात त्यांनी पाय गमावला आहे. या साऱ्यातून जगाने आदर्श घ्यावा, अशा आपत्ती व्यवस्थापनाची नोंद झाली.

जगभरातून तैवानची जनता व प्रशासनावर कौतुकाचा वर्षाव सुरू आहे. तैवानला हे साधले कारण बांधकामाचे अत्यंत कठोर कायदे, अत्यंत प्रभावी सेस्मोलॉजिकल नेटवर्क आणि अखेरच्या घटकापर्यंत पाझरलेले भूकंपविषयक लोकशिक्षण, ही या आपत्ती व्यवस्थापनाची त्रिसूत्री आहे.यापैकी इमारतींचे बांधकाम हा विषय तैवान, तसेच जपान, इटली देश किंवा अमेरिकेतील कॅलिफोर्निया प्रांतांनी गंभीर्याने हाताळल्याचे मानले जाते. कारण, भूकंपामुळे माणसे मरत नाहीत, तर ती इमारतींखाली दबून मरतात, हे या नैसर्गिक आपत्तीचे वास्तव आहे. भूगर्भातील प्रत्येक हालचालींच्या नोंदी ठेवणारी वैज्ञानिक व्यवस्था हे त्यापुढचे पाऊल आहे. आधुनिक विज्ञानात त्यासाठी कृमी, कीटक, प्राणी, पक्षी यांसारख्या निसर्ग अधिक जवळून अनुभवणाऱ्या घटकांचे सतत निरीक्षण, त्याच्या नोंदी आणि अनेक वर्षांच्या त्या नोंदीच्या आधारे अनुमान हे सूत्र राबविले जाते. जपान किंवा इटलीमध्ये त्यावर आधारित अद्ययावत यंत्रणा तयार करण्यात आल्या आहेत. त्या तोडीचे सेस्मोलॉजिकल नेटवर्क तैवानमध्ये कार्यरत आहे. भूकंप प्रतिबंधक त्रिसूत्रीमधील लोकशिक्षणाचा तिसरा मुद्दा थेट नागरिकांना व्यवस्थेत सहभागी करून घेणारा आहे. शाळा-महाविद्यालये, कामांच्या ठिकाणी 'क्वेकड्रील' हा तैवानमध्ये सतत चालणारा उपक्रम आहे.तैवानला भूकंप नवे नाहीत. कारण हा जेमतेम ३६ हजार चौरस किलोमीटर व अडीच कोटींपेक्षा कमी लोकसंख्येचा देश 'पॅसिफिक रिंग ऑफ फायर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीव्र भूकंपप्रवण टापूच्या काठावर आहे. समुद्राखालील पॅसिफिक सी-प्लेट व युरेशियन प्लेट सतत एकमेकांवर आदळत असतात. त्यामुळे सतत भूकंप होतात. १९८० पासून रिक्टर स्केलवर ४ किंवा त्यापेक्षा अधिक तीव्रता असलेल्या तब्बल दोन हजार भूकंपांची नोंद झाली आहे. त्यातील शंभर भूकंपांची तीव्रता तर ५.५ पेक्षा अधिक होती. रिक्टर स्केलवर ७.७ नोंद असलेला २१ सप्टेंबर १९९९ चा भूकंप सर्वाधिक विनाशकारी होता. त्यात २४०० जणांचे बळी गेले. एक लाखाहून अधिक लोक जायबंदी झाले. हजारो इमारती पत्त्यासारख्या कोसळल्या. ती आपत्ती तैवानसाठी वेदनादायी होतीच. पण, त्यापेक्षा अधिक वेदना होत्या त्या जगभरातून झालेल्या टीकेच्या. विशेषत: भूकंपानंतर शिथिल राहिलेली सरकारी यंत्रणा त्या टीकेचे लक्ष्य होती. मदतकार्य उशिरा सुरू झाले. वैद्यकीय पथके पोहोचायलाच कित्येक तास लागले. वेळेवर उपचार न झाल्याने अनेकांचे जीव गेले. तो भूकंप व

टीकेपासून तैवानने धडा घेतला. नवा आपत्ती प्रतिबंध व संरक्षण कायदा आणला. भूकंपाची माहिती तत्काळ पोहोचविणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. इमारत बांधकामांत नवतंत्राचा वापर अनिवार्य करण्यात आला. धोकादायक इमारती बांधणाऱ्यांवर कायद्याचा अंकुश लावला गेला. २०१६ मधील एक उदाहरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. तैनान भागात भूकंप झाला. एक सतरा मजली इमारत कोसळली. त्यात अनेकांचे जीव गेले. ती इमारत योग्य त्या तंत्राचा वापर करून बांधण्यात आली नसल्याने पाच जणांविरुद्ध खटला भरला गेला व त्यांना तुरुंगवास झाला. अशा कारवायांमधूनच सार्वजनिक शिस्त येते. अप्रत्यक्ष लोकशिक्षणही घडते आणि आपल्याकडील मुंबई स्पिरीट म्हणतात तशी अस्मानी असो की मानवनिर्मित, कोणत्याही संकटावेळी आवश्यक असलेले सामूहिक भान तयार होते. हे भानच शेकडो, हजारो लोकांचे जीव वाचविते.

# दिंडोरीत माकपच्या भूमिकेत बदल, जागा न सोडल्यास उमेदवारीची तयारी

**नाशिक :** दिंडोरी लोकसभेची जागा महाविकास आघाडीने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला द्यावी अन्यथा पक्षाच्या चिन्हावर उमेदवार देण्याचा पवित्रा जाहीर करुन माकपने आपली भूमिका बदलली आहे. याआधी माकपचे इच्छुक उमेदवार जिवा पांडू गावित यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचे मान्य केले होते. अर्ज भरण्याची घटिका जवळ येत असताना माकपने जाहीर सभेतून शक्ती प्रदर्शन करीत महाविकास आघाडीची कोंडी केली आहे.

माकपने दिंडोरी येथे शेतकरी, कामगार, शेतमजुरांच्या जाहीर सभेतून शक्ती प्रदर्शन करीत या जागेवर नव्याने हक्क सांगितला आहे. या जागेवर महायुतीच्या उमेदवार, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, महाविकास आघाडीचे भास्कर भगरे आणि वंचितकडून महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे हे मैदानात आहेत. उमेदवार जाहीर करण्यापूर्वी शरद पवार यांनी नाशिक दौऱ्यात माकपचे माजी आमदार, इच्छुक जिवा पांडू गावित यांच्याशी चर्चा केली होती. माकपने लोकसभेत मदत करावी, विधानसभेत त्यांची परतफेड करण्याची भूमिका पवार यांनी मांडली होती. महाविकास आघाडीच्या



जागा वाटपात राष्ट्रवादी शरद पवार गटाने उमेदवार जाहीर केल्यानंतर खुद्द गावित यांनी माकप निवडणूक लढविणार नसल्याचे म्हटले होते. माकप महाविकास आघाडीला मदत करणार होते. परंतु, विशाल सभेतून माकपने या जागेवर दावा करीत मैदानात उतरण्याचा इशारा दिला आहे. माकपचे राज्य सचिव उदय नारकर यांनी माकपला जागा न सोडल्यास पक्षाच्या चिन्हावर उमेदवार देण्याचे जाहीर केले.

दिंडोरीच्या जागेसाठी माकप आधीपासून आग्रही होते. यासंदर्भात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांची भेट घेऊन वेळोवेळी दावा केला होता. परंतु, अचानक राष्ट्रवादी काँग्रेसने दिंडोरीत उमेदवाराची घोषणा केली. राष्ट्रवादीची ही कृती महाविकास आघाडीच्या एकजुटीला व सहकारी पक्षांच्या विश्वासाला धक्का देणारी होती. या संदर्भात व्यवस्थित चर्चा होणे अपेक्षित होते. आमचा दावा लक्षात न घेता राष्ट्रवादी काँग्रेसची कृती मान्य नसल्याचा पवित्रा माकपने स्वीकारला आहे. हजारो आदिवासी शेतकऱ्यांना घेऊन नाशिक- मुंबई पायी मोर्चा काढणारे माजी आमदार जिवा पांडू गावित हे विधानसभा निवडणुकीत आजवर सातवेळा निवडून आले. आदिवासींच्या प्रश्नांवर त्यांचा सातत्याने संघर्ष सुरू आहे. मतदार संघात माकपची सव्वा लाखाच्या आसपास मते आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाची नाममात्र शक्ती आहे. त्यांचे चार आमदार अजित पवार गटात गेले. भाजपचा पराभव राष्ट्रवादीचा उमेदवार करू शकत नाही. त्यामुळे ही जागा माकपसाठी सोडायला हवी, असे माकपचे राज्य सचिव मंडळाचे सदस्य डॉ. डी. एल. कराड यांनी म्हटले आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अजून वेळ आहे. दिंडोरी लोकसभेची जागा माकपला देण्याचा सकारात्मक निर्णय महाविकास आघाडीच्या नेत्यांनी घ्यावा. अशी आग्रही मागणी सभेतून करण्यात आली.

# औरंगाबादमधून भुमरे यांना उमेदवारी

## भाजपचे डॉ. कराड यांच्या मेहनतीवर पाणी

**मुंबई :** औरंगाबाद मतदारसंघातून शिवसेनेच्या शिंदे गटाने रोजगार हमी योजना आणि फलोत्पादनमंत्री संदीपान भुमरे यांची उमेदवारी अखेर शनिवारी जाहीर केली. हा मतदारसंघ शिवसेनेकडे कायम राहिल्याने गेली दीड वर्षे निवडणूक लढण्याची तयारी केलेले केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले. औरंगाबादचा प्रश्न सुटला असला तरी ठाणे, नाशिक, पालघर आणि दक्षिण मुंबई या मतदारसंघांचा तिढा अद्यापही सुटू शकलेला नाही.



औरंगाबाद (शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर झाले असले तरी लोकसभा मतदारसंघाचे नाव औरंगाबादच आहे) लोकसभा मतदारसंघावरून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. गेली दीड वर्षे या मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी तयारी सुरू केली होती. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औरंगाबाद सोडण्यास नकार दिल्याने शेवटी भाजपला हट्ट सोडून द्यावा लागला. शिवसेनेच्या ठाकरे गटाने ओबीसी समाजातील चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी दिल्याच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाने भुमरे यांना उमेदवारी देऊन 'मराठा कार्ड' खेळले आहे.

भुमरे पैठण मतदारसंघातून चार वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत. पण त्यांचा पैठण विधानसभा मतदारसंघ जालना लोकसभा मतदारसंघाला जोडलेला आहे. यामुळे शिंदे गटाचा उमेदवार मतदारसंघातील नाही हा प्रचार करण्यास खैरे यांना वाव मिळाला आहे. लोकसभा निवडणूक लढण्याची भुमरे यांची फार काही इच्छा नव्हती. पण शिंदे यांनी फारच आग्रह धरल्याने भुमरे तयार झाल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले.

औरंगाबादमधून लढण्याची भाजपचे डॉ. कराड यांनी सारी तयारी केली होती. गेली दीड वर्षे वित्त खात्याच्या माध्यमातून शहरात बँकिंग मेळावे, कर्जवाटप असे विविध कार्यक्रम केले होते. हा मतदारसंघ भाजपला मिळाला पाहिजे या नेतेमंडळींनी आग्रह धरला होता. धार्मिक ध्रुवीकरणाची पार्श्वभूमी असलेल्या या मतदारसंघात शिवसेनेचाच उमेदवार टिकाव धरू शकतो हे शिंदे यांनी भाजप नेत्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. यानुसार भाजपला औरंगाबादवरील हक्क सोडावा लागला.

भाजपमध्ये उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातील उमेदवारीचा तिढा सुटलेला नाही. विद्यमान खासदार पूनम महाजन यांच्या उमेदवारीबाबत स्पष्टता नाही. मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांना लढण्याच्या आग्रह धरण्यात येत असला तरी त्यांची तयारी नसल्याचे समजते. भाजपने उत्तर मुंबईतून पियूष गोयल तर ईशान्य मुंबईतून मिहिर कोटेचा या दोन बिगर मराठी भाषकांना उमेदवारी जाहीर केली आहे.

# आसाम रायफल्सच्या माजी सैनिकांसाठी महाराष्ट्रात प्रथमच केंद्र



**नाशिक :** आसाम रायफल्सच्या माजी सैनिकांच्या गरजांची पूर्तता, अडचणींचे निराकरण करण्याच्या उद्देशाने आसाम रायफल्स महासंचालनालयाने नाशिक येथे राज्यातील पहिले आसाम रायफल्स माजी सैनिक संघटना केंद्र कार्यान्वित केले आहे. या केंद्रामार्फत दलातून निवृत्त होणाऱ्या सैनिकांना आरोग्य सेवा सहाय्य, व्यावसायिक शिक्षण, समुपदेशन आणि विविध कल्याणकारी सुविधा देण्याचे काम केले जाणार असल्याचे आसाम रायफल्सचे महानिर्देशक लेफ्टनंट जनरल प्रदीप चंद्रन नायर यांनी सांगितले.

रविवारी येथे तोफखाना केंद्रातील तोपची सभागृहात आसाम रायफल्सच्या माजी सैनिकांचा मेळावा पार पडला. यावेळी आसाम रायफल्स माजी सैनिक संघटना केंद्राचे उद्घाटन नायर यांच्या हस्ते करण्यात आले. आसाम रायफल्समध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या माजी सैनिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. नाशिक येथील केंद्र महाराष्ट्र व आसपासच्या राज्यांत वास्तव्यास असणाऱ्या आसाम रायफल्सचे एक हजारहून अधिक माजी सैनिक आणि वीर नारींची मदत व गरजांची पूर्तता करेल, असे यावेळी सांगण्यात आले. मेळाव्यात २५० हून अधिक माजी सैनिक, वीर नारी व त्यांचे कुटुंबिय सहभागी झाले होते. माजी सैनिकांशी लेफ्टनंट जनरल नायर यांनी संवाद साधला.

२३ मार्च २०२४ रोजी साजरा करण्यात आलेल्या पहिल्या आसाम रायफल्स माजी सैनिक दिनानंतर आसाम रायफल्सच्या माजी सैनिकांनी संपर्क साधण्यात सुलभता यावी, या हेतूने आसाम रायफल्सने माजी सैनिक संघटनेच्या सोबतीने येथे नवीन आसाम रायफल्स माजी सैनिक संघटना केंद्राची स्थापना केली आहे. महाराष्ट्रातील हे पहिले केंद्र आहे. हे केंद्र राज्यातील आसाम रायफल्सच्या माजी सैनिकांना कल्याणकारी सुविधा आणि सहाय्य सेवा देण्यासाठी समर्पित असेल. माजी सैनिकांची निवृत्तीपश्चात काळजी आणि त्यांना आवश्यक ती मदत देणे, हे या केंद्राचे उद्दिष्ट असल्याचे आसाम रायफल्सने म्हटले आहे.

**कल्याणकारी योजनांची माहिती**

कार्यक्रमात माजी सैनिकांसाठी राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना आणि आर्थिक मदतीची माहिती देण्यात आली. त्या अंतर्गत नैसर्गिक आपत्तीदरम्यान एकाच वेळी १२ हजार रुपये, सैनिकांच्या विधवांना त्यांच्या दोन मुलींच्या लग्नासाठी २० हजार रुपयांची मदत, वैद्यकीय मदत म्हणून माजी सैनिक व सैनिकांच्या विधवा यांना ९० हजार रुपये, पाल्यांच्या शिक्षणासाठी इयत्ता अकरावी ते बारावीसाठी वार्षिक पाच हजार रुपये मदत. उच्च शिक्षण अनुदान केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी (एम टेक, एमबीए, बीटेक, एमबीबीएस, बीडीएस आणि तत्सम अभ्यासक्रम) प्रतिवर्षी १० हजार रुपये मदतीचा समावेश आहे.

# संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ पदफेरीत राजारामपूरी, शाहूपूरी व्यापारी पेठ एकवटली

**कोल्हापूर :** महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ झालेल्या पदफेरीत राजारामपूरी व यावेळी खासदार धनंजय महाडिक म्हणाले, राजारामपुरी, शाहूपुरी पाठोपाठ कोल्हापूर शहर संजय मंडलिक यांच्या विजयासाठी पुढे आले आहे. मोदींची पंतप्रधान पदाची हॅट्रिक साधत संजय मंडलिक यांना दुसऱ्यांदा संसदेत पाठवूया.'

येथे पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'संजयदादांचा विजय असो', 'फिर एक बार मोदी सरकार' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. या पदयात्रेत उमेदवार संजय मंडलिक, खासदार धनंजय महाडिक, माजी आमदार राजेश क्षिरसागर, भाजपाचे महेश जाधव, महानगर जिल्हाध्यक्ष विजय जाधव, सत्यजीत उर्फ नाना



कदम, रुपाराणी निकम, विलास वास्कर आदि प्रमुख पदयात्रेत सहभागी झाले होते. महिलांचा सहभाग लक्षणीय दिसत होता. भाजपा, शिवसेना, आरपीआय आठवले गट, जनसुराज्य व सहकारी पक्षाचे झेंडे घेवून पदयात्रेत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पदयात्रेची सुरुवात राजारापूरी येथील माऊली पुतळ्यापासून करण्यात आली. फटाक्याची आतषबाजी हालगी, घुमक्याच्या निनादात आणि धनुष्यबाणाच्या विजयी करण्याच्या प्रचंड घोषणा देत पदयात्रा हनुमान मंदीर, राजारापूरी ८ वी, ७ वी, व ३ ऱ्या गल्लीतून बागल चौक मार्गे शाहूपुरी ५ गल्ली, नाईक कंपनी, २ - या गल्लीतून महायुतीच्या प्रचार कार्यालयात पदयात्रेची सांगता करण्यात आली. यावेळी उमेदवार संजय मंडलिक म्हणाले, 'जिल्ह्यातून दिवसेंदिवस मिळणारा वाढता आणि उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आपला विजय निश्चित आहे. या विजयासाठी महायुतीच्या सर्वच घटक पक्षाचे नेते आपापल्या पातळ्यावर काम करीत असून सर्वच कार्यकर्त्यांची मोठी ताकद माझ्या मागे उभी आहे. हेच सर्व कार्यकर्ते धनुष्यबाण चिन्ह घराघरात पोहचवून मोठ्या मताधिक्याचा विजय मिळवून देतील. असा ठाम विश्वास मंडलिक यांनी व्यक्त केला.

पदयात्रेत भाजपाचे शहर अध्यक्ष विजय जाधव, राहूल चिकोडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शैलेश पाटील, मंडल अध्यक्ष सचिन कुलकर्णी, विकास घागेर, सागर संगोळी, ओंकार चव्हाण, निलेश प्रभावळे, सचिन पवार, रमेश पुरेकर, वंदना बंबलवार, रंजना शिर्के, शेखर मंडलिक, आदिसह भाजपा शिवसेना, जनसुराज्य, आरपीआय आठवले गट आणि महायुती घटक पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# हांडेवाडी भागातील नागरिक पाणीटंचाईने त्रस्त

## मनपाचे पाणी टँकरही नियमित पाणी टाकत नसल्याने नागरीकांचे पाण्याविना हाल

**हडपसर : प्रतिनिधी**

पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या हांडेवाडी गावाला व परिसरातील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याचे चित्र सध्या हांडेवाडी, उंड्री , औताडेवाडी, होळकरवाडी परिसरात भिषण पाणीटंचाई जाणवत असून येथील भागाला महापालिकेचे पाणी टॅन्कर ही चारचार दिवस पाणी टाकत नसल्याने या भागातील नागरीकांचे पिण्याच्या पाण्यावाचून हाल होत असल्याचे नागरिक सांगत आहेत.

हांडेवाडीतील अनेकांचे बोअरवेल मध्ये पाणी येत नाही, विहीरी कोरड्या पडल्या आहेत, जे पाणी पुणे महापालिकेकडून टॅन्कर द्वारे देण्यात येते ते टॅन्कर ही दोनचार दिवसानी पाणी टाकत असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. हांडेवाडी, होळकरवाडी , औताडेवाडी ,उंड्री, वडाचीवाडी ,परिसरातील सोसायटीमधील नागरीक खाजगी टॅन्कर मागवून पाणी समस्या मिटवत असलेतरी पाणीपुरवठा करणा-या खाजगी टॅन्करच्या भाव वाढलेले असल्याने चढ्या भावानेच टॅन्कर विकत घ्यावे लागत असल्याचे अनेक सोसायटीचे चेअरमन सांगत आहेत.

हांडेवाडीतील ग्रामपंचायतीच्या नळाला पाणी येत नाही, मनपाचे टॅन्कर टाकीत टाकल्यानंतर थोडावेळ नळाला पाणी येते ते पाणी कोणाला मिळते तर कोणाला मिळत नाही, सध्या कडक उन्हामुळे नागरीकांच्या अंगाची लाहीलाही होते अंघोळ करण्यास घरात पाणी टंचाई भासत असल्याचे नागरिक त्रस्त झाले आहेत.

पुणे महापालिकेने हांडेवाडी, उंड्री, होळकरवाडी , औताडेवाडी, उरळीदेवाची उरळी , वडाचीवाडी, नागरीकांना पाणी टॅन्कर वाढवून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, या भागातील नागरीकांची कायमस्वरुपी पाणी समस्या पाईप लाईन टाकून पाणीप्रश्न कायमचा सोडविण्यात यावा, अशी मागणी परिसरातील नागरीकांनी केली आहे.




“ हांडेवाडी परिसरातील नागरीकांचे पाण्यासाठी हाल होत आहेत, मागील महिन्यापासून नागरीकांना भिषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे,न्हावलेनगर, मयुरपार्क, सिध्दीविनायक सोसायटी, आनंदनगर भागात मनपाचे टॅन्करने नागरीकांना पाणीपुरवठा केला जातो, दररोज चार टॅन्कर ऐवढ्या मोठ्या भागास पुरत नाहीत, ते पण वेळेत येत नाही त्यामुळे पाण्यावाचून नागरीकांचे प्रचंड प्रमाणावर हाल होत आहेत, मनपाने पाणी टॅन्कर वाढवावे व दररोज नियमित पाणी पुरवठा करावा , मनपाने पुढील पाण्याचे नियोजन हे टॅन्कर द्वारे न करता कायमस्वरुपी पाणीलाईन टाकून पाणी प्रश्न सोडविण्यात यावा.

– अशोक न्हावले, माजी उपसरपंच, हांडेवाडी

“ हांडेवाडी, न्हावलेनगर व हांडेवाडी परिसरातील नागरीकांना पिण्याचे पाणी मिळत नाही, जे टॅन्करने पाणीपुरवठा केला जातो तो आठ आठदिवस पाणी टॅन्कर येत नाही , खाजगी टॅन्कर गरिब नागरीकांना परवडत नाही , सोसायटी मधील हायफाय नागरिक खाजगी टॅन्कर मागवून आपली तहान भागवत आहेत ते पण टॅन्कर ला मोठी किंमत मोजून आम आदमी गरिब नकगरीकांने काय करायचे येत्या दोन चार दिवसात मनपाने पाणी टंचाई दुर नाही केली , टॅन्कर वेळेत नाही पाठवले तर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

– विशाल धावारे, सामाजिक कार्यकर्ता, हांडेवाडी

“ उंड्री व वडाचीवाडी परिसरातील नागरिक पाणीटंचाईने ग्रस्त आहेत, उंड्री परिसरातील नागरीकांना सध्या महापालिका टॅन्करनेच पाणीपुरवठा केला जातो , पाणी टॅन्कर पुरेसे पडत नाहीत, बोअरचे विहिरीचे पाणी तळ गाठला असून , सोसायटीमधील नागरीक हे खाजगी टॅन्कर विकत घेऊन काम भागवत आहेत. प्रशासनाकडून कायमस्वरुपी पाणी योजना कार्यान्वित करण्यात यावी.

– दीपक बांदल, सामाजिक कार्यकर्ते, उंड्री

“ हांडेवाडी भागाला व परिसरातील नागरिकांना पाणी समस्या झळ पोहचत आहे, वरुन कडक उन्हाळा सुरु झाल्याने पाणीटंचाई भासत आहे , मनपा प्रशासनाने या भागातील नागरिकांसाठी पाणी टॅन्कर संख्या वाढवून नागरीकांची पाण्याची गरज भागवावी , आणि कायमस्वरुपी नळयोजना राबविण्यात यावी.

– विकास हांडे, स्थानिक नागरिक, हांडेवाडी

“ आमच्या बोअरवेल तळगाठल्या आहेत, नळाला पाणी येत नाही, आमच्या भागाला टॅन्करने पाणीपुरवठा केला जातो, टॅन्कर वेळेत येत नाहीत, पाण्यावाचून हाल होत आहेत, पाणी पुरवठा सुरळित करण्यात यावा..

– बापू हांडे, आनंदनगर, हांडेवाडी

# बारामतीत महावीर जन्म कल्याणक निमित्त विविध कार्यक्रम संपन्न



**राजदंड /बारामती**

दरवर्षी प्रमाणे यंदाही सकल जैन समाजाच्या वतीने आज (दि २१) बारामतीत महावीर जन्मकल्याणका निमित्त सकाळी महावीर पथवरील श्री मुनिसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदिरापासून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शोभायात्रेत अबाल वृद्धांसह जैन समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मध्ये जैन युवकांच्या ढोल पथकाने पारंपरिक पध्दतीने ढोलवादन केले.

या शोभायात्रेमध्ये दिगंबर, श्वेतांबर व स्थानकवासी जैन समुदायाचे बांधव व भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प.पू. प्रवचनकार मुनिवर्य श्री. सत्यकांत विजयजी महाराज साहेब हेही आशिर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. महावीर पथ, मारवाड पेठ, बुरुडगल्ली मार्गे भिगवण चौक, इंदापूर चौक व गुनवडी चौकातून ही शोभायात्रा गेली.

भिगवण चौकामध्ये खासदार सुप्रिया सुळे, जय अजित पवार यांच्यासह जवाहर वाघोलीकर, सदाशिव सातव, जय पाटील, अँड. संदीप गुजर, सत्यव्रत काळे, वनिता बनकर, सचिन सातव यांच्यासह अनेक मान्यवर शोभायात्रेच्या स्वागतासाठी उपस्थित होते.

दिगंबर जैन समाजाच्या वतीने किशोर शहा (सराफ), पदमकुमार मेथा, गौरव कोठडीया, संजय संघवी, धवल वाघोलीकर, अतुल गांधी, विशाल वडूजकर, श्वेतांबर जैन समाजाच्या वतीने दिलीप दोशी, पी.टी. गांधी, प्रवीण सुंदेचा मुथा, जयेंद्र मोदी, मेहुल दोशी, केवल मोता, जिगर ओसवाल तसेच स्थानकवासी जैन समाजाच्या वतीने दिलीप धोका, ललित टाटीया, किशोर कोठारी, जवाहर कटारिया यांच्यासह तिन्ही समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्री महावीर भवन येथे श्री बारामती दिगंबर जैन सैतवाळ परिवाराच्या वतीने जैन बांधवांसाठी प्रसादभोजनाचे आयोजन केले गेले. आभाळमाया ग्रुपच्या वतीने अल्पा नितीन भंडारी व त्यांच्या सहका-यांच्या वतीने वन्यक्षेत्रातील प्राण्यांची तहान भागविण्यासाठी दोन टँकर रवाना करण्यात आले. खासदार सुप्रिया सुळे व मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

# नीरा-देवघर धरणातील विसर्ग बंद; हिर्डोस मावळच्या धरणग्रस्तांनी रोखले पाणी




**भोर/प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील हिर्डोस मावळ खोऱ्यातील नीरा-देवघर धरण क्षेत्रात अत्यल्प पाणीसाठा असता नाही धरण प्रशासनाने पूर्वे कडील भागात मागील १० ते १५ दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू केला होता. हिर्डोस मावळ खोऱ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या असतानाही धरण क्षेत्रातील पाण्याचा विसर्ग सुरू केल्याने संतप्त धरणग्रस्त नागरिकांनी प्रशासनाला धारेवर धरत शनिवार (दि. २०) रोजी आंदोलन छेडल्याने प्रशासनाने तात्काळ पाण्याचा विसर्ग बंद केला.

भोर तालुक्यातील हिर्डोस मावळ खोऱ्यातील अनेक गावे निरा-देवघर धरणाच्या पाणी साठ्यातील पाण्यावर अवलंबून आहेत. सध्या कडक उन्हाळा पडल्याने धरण परिसरातील गावांची पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली असतानाही प्रशासनाने धरणातून २ हजार क्यूसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरू केला होता.यामुळे धरणात २६ टक्के पाणीसाठा उरला असून पुढील काळात पाणी पाणी करण्याची वेळ हिर्डोस मावळ धरणग्रस्तांना येणार असल्याने धरणग्रस्तांनी तात्काळ जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून तात्काळ धरणातून सुरू असलेला विसर्ग रोखण्यास भाग पाडले. यावेळी ३० ते ३५ धरणग्रस्तांनी धरणाच्या गेटवर बसून काळ्याफिती लावून घोषणाबाजी केल्याने अखेर धरण प्रशासनास पाणी बंद केले.

दरम्यान, भाटघर धरणामधून पाण्याचा विसर्ग सुरु होता भाटघर धरण प्रकल्प पुनर्वसन सेवा संघाने त्वरित पाण्याचा विसर्ग थांबवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले व विसर्ग बंद न केल्यास आम्ही लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकू तसेच अनेक वेळा निवेदने देऊनही मार्ग निघत नसेल तर आम्ही जलसमाधी घेऊ असा कडक इशारा दिल्याने यादरम्यान धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग बंद करण्यात आला.

“ **कालवा सल्लागार समितीच्या नियोजना प्रमाणे निरा –देवघर आणि भाटघर धरणातील पाण्याचे नियोजन केले असून कोणालाही पिण्याच्या पाण्याची अडचण येणार नाही.**

**– दिगंबर डुबल, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग**

# संगीतकार अजय-अतुल यांच्याविरोधात निदर्शने

## अजय-अतुल यांनी आर्थिक फसवणूक केल्याचा ॲड. राधिका कुलकर्णी यांचा आरोप

**राजदंड / पुणे**

बालेवाडी येथे मागे झालेल्या एका इव्हेन्टमध्ये संगीतकार अजय-अतुल यांनी आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करून एड.राधिका कुलकर्णी या आयोजक महिलेने सहकाऱ्यांसह संगीतकार अजय-अतुल यांच्या विरोधात काळे झेंडे घेऊन रविवारी सायंकाळी अण्णाभाऊ साठे सभागृहासमोर निदर्शने केली.तसेच घोषणाबाजी केली. त्यानंतर एड.कुलकर्णी यांनी माध्यमांशी बोलताना अजय-अतुल यांच्यावर आर्थिक फसवणुकीचा आरोप केला.

अण्णाभाऊ साठे सभागृहात फिरोदिया करंडक पारितोषिक वितरण कार्यक्रमास अजय-अतुल हे प्रमुख पाहुणे म्हणून येणार असल्याचे समजताच कुलकर्णी यांनी निदर्शने करण्याची परवानगी पोलिसांकडे मागितली होती.या प्रकरणी संगीतकार अजय-अतुल यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

ॲड. राधिका कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या भागीदार असलेल्या गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंट कंपनीने सन २०२७ साली संगीतकार अजय -अतुल यांची बालेवाडी स्टेडियम येथे कॉन्सर्ट आयोजित केली होती. या कॉन्सर्टसाठी अजय -अतुल यांना मानधन द्यायचे ठरले आणि देण्यात आले. ईमेलवर कबूल केल्याप्रमाणे ठरलेले नामवंत कलाकार त्यांनी या कार्यक्रमात सहभागी करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र ठरलेले मोठे कलाकार आले नाहीत. त्यामुळे तिकीट विक्रीच्या माध्यमातून गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंट कंपनीला अपेक्षित रक्कम जमा करणे शक्य झाले नाही. गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंट कंपनीला काही कोटी रुपयांचा फटका बसला. अनेक गुंतवणूकदार यामुळे हवालदिल झाले.




गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंट कंपनीने त्यांचे कोट्यवधी रुपये वसूल व्हावेत व गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत याकरिता कलर्स मराठी चॅनलला संबंधित लाईव्ह कॉन्सर्ट प्रदर्शित करण्यासाठी प्रस्ताव ठेवला.संगीतकार अजय-अतुल यांनी या इव्हेंटचे आयोजक स्वतःच असल्याचे सांगून कलर्स मराठीला प्रसारणाचे हक्क विकले.त्यातून मोठी कमाई केली.अशा तऱ्हेने त्यांनी गायक म्हणून मानधन घेतले,ठरलेले कलाकार तर नाही आणले,पुढे स्वतःच आयोजक असल्याचे भासवून कलर्स मराठीला हक्क विकले. फसवणूक करत संगीतकार गायक अजय अतुल जोडीने ही रक्कम हडप केली.पाठपुरावा करणाऱ्या आयोजकांना प्रतिसाद दिला नाही.',असा आरोप एड.कुलकर्णी यांनी निदर्शनानंतर माध्यमांशी बोलताना केला. मात्र, अजय अतुल यांनी संबंधित कॉन्सर्टचे आयोजक आपण स्वतः असल्याचे भासवून परस्पर कलर्स मराठीकडून पैसे गैरमार्गाने स्वतःच्या नावावर घेतले आहेत. तर दुसरीकडे कॉन्सर्टसाठी आलेल्या विदेशी ऑर्केस्ट्रा बँड पथकाला देखील गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंटने वेगळी रक्कम दिलीय. यामुळे गोल्डन एंटरटेनमेंट कंपनीला सर्व बाजुंनी कोटयवधी रुपयांचा फटका बसला आहे.एक रुपया देखील नफा मिळालेला नाही. यामुळे गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंट कंपनीचे संचालक संपूर्णपणे उध्वस्त झालेले आहेत.

'एकीकडे गोल्डन पिरॅमिड एंटरटेनमेंट कंपनीकडून कॉन्सर्टसाठी पैसे वसूल करायचे तर दुसरीकडे कलर्स मराठी चॅनलला आपणच आयोजक असल्याचे भासवून कलर्स मराठीकडून कईक कोटी रुपये उकळायचे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झालेले आहेत व मनी लॉन्ड्रीग देखील झालेली आहे.

# मोरणा विभागात यात्रांचा हंगाम सुरू; कोकिसरे येथे उद्या कुस्त्यांचे भव्य मैदान

**पाटण /प्रतिनिधी**

पाटण तालुक्यातील मोरणा विभागात सालाबादप्रमाणे ग्रामदैवतांच्या यात्रांचा हंगाम रविवार पासून सुरू झाला असून भागातील, आंबेघर, गोकुळ, कोकिसरे, आंब्रग, नाटोशी, कुसरुंड आदी गावच्या ग्रामदैवतांच्या यात्रा होणार आहेत. यात्रेनिमीत्त धार्मिक, मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कोकिसरे गावचे ग्रामदैवत श्री ज्योतीलिँग व नवलाई देवीची वार्षिक यात्रा सोमवार दिनांक २२ व मंगळवार दिनांक २३ रोजी संपन्न होत असून यात्रेच्या मुख्य दिवशी मंगळवारी कुस्त्यांचे भव्य जंगी मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रथम बक्षीस ५१ हजार, द्वितीय बक्षीस ४१ हजार, तृतीय बक्षीस ३१ हजार, चतुर्थ बक्षीस २१ हजार साठी नामांकित पैलवानांच्या कुस्त्या होणार आहेत.

तसेच सोमवारी सायंकाळी ४ ते ११ वा.व मंगळवारी सकाळी ६ते९ वा. देवांचा छबिना होईल, मनोरंजनासाठी महादेव मनवकर यांचा लोकनाट्य तमाशा होणार आहे,, तरी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमेटी, व ग्रामपंचायत कोकिसरे यांनी केले आहे.

पान १ वरून

## माढ्यात महायुतीला झटका

यांनी म्हटलं आहे.

- **आता बारामतीत अजित पवारांचा पराभव करूनच पक्ष सोडणार'; राष्ट्रवादीच्या नेत्याचा जाहीर इशारा**

बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये आता अजित पवार यांच्यासमोर त्यांच्याच पक्षातून नवं आव्हान निर्माण झालं आहे. बारामतीमध्ये अजित पवारांचा पराभव करुनच पक्ष सोडणार असल्याची भूमिका राष्ट्रवादीच्या नेत्याने घेतली आहे.

- **उत्तमराव जानकरांच्या साथीने लढाई करण्यास दहा हत्तींचे बळ – धैर्यशील मोहिते–पाटील**

आज माळशिरस तालुक्याच्या दृष्टीने क्रांतिकारी दिवस आहे. गेली २५-३० वर्षे असणारा मोहिते पाटील- जानकर गटाचा पारंपरिक विरोध संपून आता नव्या पर्वाला सुरुवात होत आहे. उत्तमराव जानकर यांच्या गटाने माझ्या उमेदवारीला साथ दिली आहे. त्यामुळे मला लढाई करण्यास दहा हत्तीचे बळ आले आहे. तुम्ही घेतलेला हा निर्णय मी कधीच विसरू शकत नाही. आपल्याला तालुक्याच्या विकासासाठी व स्वाभिमानासाठी एकदिलाने काम करायचे आहे. तुमच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा माझ्याकडून नेहमीच मान सन्मान राखला जाईल.

- **ही निवडणूक माढंयाच्या स्वाभिमानाची आहे – उत्तमराव जानकर**

धैर्यशील भैय्या म्हणजे मीच उमेदवार या भावनेने ६ तालुक्यात ताकदीने काम करणार. धैर्यशील भैय्या यांना ३ लाख मतांनी निवडून देणार.

- **तुमच्या स्वाभिमानासाठी माझी लढाई:– धैर्यशील मोहिते पाटील**

आज तालुक्यातील विरोध संपवून आपण नवीन पर्वाला सुरुवात करत आहोत. माझ्यावर कितीही खोटा दबाव आणला तरी मी तुमच्या स्वाभिमानासाठी व शेतकरी प्रश्नांसाठी कायम लढा देणार. आदरणीय बाळ दादा यांनी मला या लढाईला बळ दिले आहे.

- **माझा शब्द अंतिम असतो – जयसिंह मोहिते पाटील**

मी खूप काही बोलत नाही. जानकर साहेब आपण तालुक्याच्या विकासासाठी व स्वाभिमानासाठी एकत्र काम करूया.

- **आजची सभा म्हणजे क्रांतिकारी निर्णय आहे – आ. जयंत पाटील**

मला खात्री होती. जानकर साहेब उशिरा निर्णय घेतील आणि तो योग्य असेल. मोहिते पाटील आणि जानकर या गटाने महाराष्ट्र राज्याला स्वाभिमानाचा संदेश दिला.

यावेळी विठ्ठल सहकारी कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील, रविंद्र पाटील, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, नामदेव वाघमारे, तुकाराम देशमुख, गौतम आबा माने, माऊली पाटील, माणिक बापू वाघमोडे, अजय सकट, संदीप मांडवे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## जलद प्रतिसाद पथकाचे सातारा शहरात 'मॉक ड्रील'

होते. नागरिकांची रेलचेल सुरू होती. यावेळी अचानक काही मोर्चेकरी घोषणाबाजी करत मोती चौकात आले. त्यांना नियंत्रित करण्यासाठी जलद प्रतिसाद पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. काही वेळात दगडफेक सुरू झाली अन् गर्दी पांगविण्यासाठी पथकाला पुढाकार घ्यावा लागला. यावेळी अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडण्यात आल्या. अधिकाऱ्यांकडून पथकाला ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना केल्या जात होत्या.

अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये काही काळ थरकाप उडाला; परंतु जलद प्रतिसाद पथकाचे हे प्रात्यक्षिक असल्याचे समजल्यानंतर नागरिकांनी मोकळा श्वास घेतला. या प्रात्यक्षिकादरम्यान एक हँड ग्रेनेड व एका गॅस गन सेलचा वापर करण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या या सरावाची शहरात दिवसभर चर्चा सुरू होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस दलाकडून राबविण्यात येत असलेल्या अशा उपक्रमाबाबत नागरिकांमधूनही समाधान व्यक्त करण्यात आले.

## प्रवासी कर व प्रदूषण कर वसुलीचा ठेका तडकाफडकी रद्द

आला होता या करारातील सर्व अटी आणि शर्थी ठेकेदाराने मान्य केल्या होत्या या अटी आणि शर्थीचे ठेकेदाराकडुन उल्लंघन झाल्याचा ठपका आता पालिकेने ठेकेदारावर ठेवला आहे.

करारानुसार पालिका व ठेकेदार यांच्यात देकार रक्कम निश्चित करण्यात आली होती ही रक्कम बँकेत जमा करीत असल्याचे पत्र ठेकेदाराने पालिकेला दिले होते परंतु प्रत्यक्षात देकार रक्कम अदयाप पालिकेकडे जमा झालेली नाही असे वर्तन हे करारातील अटींचा भंग ठरत आहे या शिवाय करारा प्रमाणे दरमहा ठराविक रक्कम ठेकेदाराने पालिकेकडे जमा करणे बंधनकारक आहे परंतु ११ महीने अशा प्रकारची रक्कम ठेकेदाराने पालिकेकडे जमा केली नाही यासाठी ठेकेदाराने दिलेले धनादेश ठेकेदाराच्या बँक खात्यात पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याने परत येत आहेत या संदर्भात पालिकेने संबंधित ठेकेदारास वारंवार लेखी नोटीस पाठवुन कळविले आहे परंतु ठेकेदाराने या नोटीसांची दखल घेतलेली दिसत नाही म्हणुन अखेर पालिकेने बालाजी इंटरप्राईजेस या ठेकेदारास दिलेला टोल वसुलीचा ठेका रद्द करण्याचा निर्णय घेतला या बाबत पालिकेने ठेकेदारास सुचना दिली व ठेकेदाराच्या उपस्थितीत सर्व टोल नाके पालिकेने आपल्या ताब्यात घेतले आहेत प्रत्येक टोन नाक्यावर खाजगी ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात येत असल्याची नोटीसा डकविण्यात आल्या आहेत.

## शिखर शिंगणापूरच्या मुंगी घाटात मानाच्या कावडीचा थरार...

भक्तीशक्तीचा रोमहर्षक सोहळा पाहण्यासाठी घाटमाथ्यावर असलेले लाखो भाविक टाळ्यांच्या गजरामध्ये कावडी धारकांचा उत्साह वाढवीत होते. दुपार पासून सर्व कावडी वर आल्यानंतर सर्वात शेवटी सासवड येथील संत भूतोजीबुबा तेली यांची मानाची कावड पाहण्यासाठी लाखो भाविक बसले होते. संत भूतोजीबुबा तेली यांची कावड घाटमाथ्यावर येताच शिवभक्तांनी हरहर महादेव अशी गर्जना करीत फटाक्याची आतषबाजी केली.लाखो भाविकांच्या हर हर महादेव या गर्जनेने अवघा महादेव डोंगर अन परिसर दुमदुमून गेला.यात्रा कालावधीत राजमाता कल्पनाराजे भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधिक्षक समीर शेख यांनी शंभू महादेव देवस्थानला भेटी दिल्या.

## साताऱ्यात भाजपकडून 'डॅमेज कंट्रोल'

व्हायरल झाली. त्या पोस्टमध्ये शंभूराज देसाई यांच्या घराबाहेरील उदयनराजेंचे भव्य तैलचित्र तसेच साताऱ्यात लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या स्मारकाला सुरुवातीला झालेला विरोध याचा उल्लेख आहे. या पोस्टचा मास्टर माईंड कोण हे उघड गुपित असल्याचे बोलले जात आहे. मात्र चित्राचा इश्यू करणाऱ्यांकडून त्यांच्या कोत्या मनोवृत्तीचे दर्शन घडले आहे हे नक्की.

या पार्श्वभूमीवर शंभूराज देसाईंच्या घराबाहेरील भिंतीवरील ते तैलचित्र रातोरात पुसले गेले आहे. निवडणुकीमुळे हे चित्र आचारसंहिता लागू होताच पडदा टाकून झाकून ठेवले होते. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर या तैलचित्राचा इश्यू झाल्यावर हे तैलचित्र रातोरात पांढऱ्या रंगाने पुसून टाकल्याचे पाहायला मिळाले. याबद्दल सातारकरांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. उदयनराजे भोसले यांना या लोकसभा निवडणुकीत सोशल मीडियावरील हा इश्यू प्रतिकूल ठरेल असे वातावरण तयार झाल्याने चित्र पुसले गेल्याची चर्चा आहे. हा सर्व महायुतीतलाच विसंवाद असला तरी त्याचा फटका निवडणुकीत बसू नये म्हणून ही काळजी घेतली गेली असल्याचे दिसते.

## जनसंवादानंतर उदयनराजेंच्या राजकीय गाठीभेटी

गाठीभेटीचा सिलसिला कायम ठेवला आहे. उदयनराजे यांना भारतीय जनता पार्टीने तिकीट जाहीर केल्यानंतर राजेंच्या प्रचाराला प्रचंड वेग आला आहे. पाटण, कराड दक्षिण व उत्तर या तीन मतदारसंघांच्या प्रचारावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. शनिवारी सातारा व कोरेगाव विधानसभा मतदारसंघात व्यस्त असणाऱ्या उदयनराजे यांनी दुपारी येथील प्रीती एक्झिक्युटीव्ह हॉटेलमध्ये रामराजे नाईक निंबाळकर व प्रभाकर घार्गे यांची भेट घेतली. रामराजे नाईक निंबाळकर हे अजितदादा गटाच्या निमित्ताने महायुतीच सामील असले तरी माढा मतदारसंघातील रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या उमेदवारीला त्यांचा आक्षेप आहे. रामराजे नाईक निंबाळकर हे संपूर्ण जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव कायम ठेवून आहेत. उदयनराजे व रामराजे यांचे राजकीय संबंध नेहमीच कडू गोड राहिले असले तरी पिढी जात स्नेहाचा सलोखा असे नेहमीच रामराजे सांगतात याचा राजकीय अर्थ काढू नये असेही ते म्हणतात मात्र लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता सुरू असताना रामराजे यांची उदयनराजे यांनी घेतलेली भेट ही राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. त्यांच्यामध्ये विविध विषयांच्या अनुषंगाने कमरा बंद चर्चा झाल्याची माहिती आहे.

## बुलढाणा लोकसभा निवडणुकीत यंदा 'रांगविरहित मतदान'

**बुलढाणा :** कडक तापमान लक्षात घेता बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत यंदा प्रथमच 'रांग विरहित' मतदानाचा अवलंब करण्यात येणार आहे. यासाठी मतदारांना टोकन देण्यात येणार असल्याने एकावेळी रांगेत फक्त पाच मतदार उभे राहणार आहे. उर्वरीत मतदारासाठी केंद्रांच्या बाजूलाच 'प्रतीक्षालय' उभारण्यात येणार आहे.

बुलढाण्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. मात्र जिल्ह्यात सद्या ४१ ते ४२ डिग्री सेल्सिअस इतके तापमान असून ते वाढण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मतदारांची सुविधा व त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्रयोग राबविण्यात येणार आहे. यंदाच्या मतदानात प्रथमच टोकन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. केंद्रावर येणाऱ्यांना टोकन देण्यात येणार आहे. एकावेळी फक्त पाच मतदार रांगेत उभे राहतील तर उर्वरीत टोकनधारक मतदारांसाठी केंद्राच्या बाजूच्या खोलीत बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे.

टोकन क्रमांकानुसार मतदानासाठी रांगेत सोडण्यात येणार आहे. महिला आणि पुरुषांना वेगळे टोकन देण्यात येणार आहे. केंद्रावर आल्यानंतर मतदारांना टोकन देण्यात येतील. पाच मतदारांना रांगेत ठेवण्यात येणार असून उर्वरीत मतदारांसाठी केंद्राच्या बाजूच्या खोलीत बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. याठिकाणी पंखे, पिण्याचे पाणी, बसण्यासाठी खुर्च्या आदी व्यवस्था करण्यात येणार आहे. या माध्यमातून रांगविरहित मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

दिव्यांग व्यक्ती सक्षम पवरून मतदान केंद्रावर येणे-जाणे आणि व्हीलचेअरची मागणी नोंदवू शकतील. अंध मतदारांना ब्रेल लिपीतील डमी मतपत्रिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. मतदान यंत्रावर निळ्या बटनाशेजारी ब्रेल लिपीतील क्रमांक असणार आहे. यंत्रावरील क्रमांक तपासून अंध मतदार मतदान करू शकतील.

## अरिहंत'कडून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास दत्त शेतकरी कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव पाटील यांचे मत



**नागपूर :** भाजपचे प्रदेशाध्यक्षचंद्रशेखर बावनकुळेयांनी परत एकदा राष्ट्रवादीचे अध्यक्षशरद पवारव उद्धवसेना प्रमुखउद्धव ठाकरेयांच्यावर टीकास्त्र सोडले आहे.शरद पवारकृषीमंत्री असताना महाराष्ट्र कृषी क्षेत्रात दहाव्या क्रमांकावर गेला होता. शरद पवार यांचा इतिहास पाहिला तर सर्वात जास्त शेतकऱ्यांवर त्यांनीच अन्याय केला. त्यांनी शेतकऱ्यांचा पुळका दाखवू नये, या शब्दांत त्यांनी टीका केली. रविवारी ते पत्रपरिषदेदरम्यान बोलत होते.-ऊाएठढखडएचएछ्ढ-वी लूशरद पवार व काँग्रेससोबत जाऊनउद्धव ठाकरेयांनी त्यांचा जनाधार संपविला. जर राज्यातील जनतेचे सर्वेक्षण केले तर महाराष्ट्रातील लायक व्यक्तीच्या यादीत टॉपवर देवेंद्र फडणवीस हे असतील. तर सर्वात नालायक व्यक्तींमध्ये सर्वात टॉपवर उद्धव ठाकरे दिसतील. उद्धव ठाकरे यांची सभा घेण्यास कुणीच तयार नाही. उद्धव यांच्या सभेला लोक येण्यास तयार नाहीत. या लोकसभा निवडणूकीनंतर उद्धव ठाकरे घरी बसतील, असा दावा बावनकुळे यांनी केला.महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांचा इतिहास बघितला तर निष्क्रिय मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे हेच ठरतील. त्यांची मानसिक स्थिती ढासळली असून ते मनोरुग्णासारखे वागतात. त्यांना लवकरच इस्पितळात दाखल करण्याची गरज आहे. आदित्य ठाकरे हे एका मतदारसंघात ते हवेत निवडून आले. त्यांची मंत्रीपदाची पात्रता होती का असा सवाल त्यांनी केला. उद्धव ठाकरे यांना विकासावर बोलता येत नाहीत तेव्हा जनतेला संभ्रमात टाकत कुणीतरी लिहून दिलेली स्क्रीप्ट वाचायची हेच त्यांचे काम आहे. त्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे, असा चिमटा बावनकुळे यांनी काढला.

## घागरी, हंडे घेऊन संतप्त महिलांचा नगरपालिकेवर हल्लाबोल

**सोलापूर :** करमाळा शहरातील रंभापुरा, सुमंतनगर, बागवान नगर, मुलाणवाडा, नागोबा मंदिर भागात पाच दिवसातून एकदाच पिण्याचे पाणी सुटते आणि तेही पंधरा मिनिटेच. आम्ही तहान कशी भागवणार असा संतप्त सवाल सोनाली तांबे, जयश्रीबाई जाधव, कीर्ती चव्हाण या महिलांनी पालिकेच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना केला. पाणी टंचाई भेडसावत असल्याने या महिला हंडे, घागरी घेऊन नगरपालिका गाठत हल्लाबोल केला. पूर्ण दाबाने सुरळीत पाणीपुरवठा न केल्यास नगरपालिकेच्या कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला.

करमाळा शहराच्या पश्चिम भागात रंभापुरा व परिसरातील भागात सात हजार लोकसंख्या वस्तीचा भाग आहे. या भागात गेल्या चार महिन्यांपासून पाच दिवसाआड एकदाच तेही अवघे पंधरा मिनिटेच कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. या भागातील नागरिक हे सर्वसामान्य व मजूर कुटुंबातील आहेत. त्यांना दररोज मजुरीने कामावर जावे लागते, पण पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे नागरिकांना कामावरून घरी बसावे लागत आहे.रंभापुरा भागातील शिंदेसेनेचे विभागप्रमुख नीलेश चव्हाण यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना थेट भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. त्यावेळी पाणीपुरवठा विभागाचे कमलाकर भोज आंदोलनस्थळी आले. तुम्ही आम्हाला पाणी देत नाही... मग बिल कसे काय वसूल करता ? घरपट्टी कशी मागता ? असा संतप्त सवाल करीत रंभापुरा भागास सुरळीत पाणीपुरवठा न केल्यास पालिकेच्या कार्यालयास कुलूप ठोकू असा इशारा दिला.

## सांगली जिल्हा परिषदेने जलजीवन योजनेच्या तब्बल १०० ठेकेदारांना ठोठावला १० लाखांचा दंड

**सांगली :** जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे अपूर्ण ठेवणाऱ्या १०० हून अधिक कंत्राटदारांना जिल्हा परिषदेने दंड ठोठावला आहे. गेल्या जानेवारीपासूनच्या तीन महिन्यांत १० लाख रुपयांहून अधिक दंडाची वसुली केली आहे.

जिल्ह्यात जलजीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याच्या ६८३ योजनांची कामे सुरु आहेत. त्यांची कामे फारच मंद गतीने सुरु आहेत. फेब्रुवारीअखेर २१४ कामे पूर्ण झाली असून १२७ योजना ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्यात आली आहेत.योजनांची गती वाढविण्यासाठी ग्रामिण पाणीपुरवठा विभागाने कंत्राटदारांकडे पाठपुरावा सुरु केला आहे. बहुतांश कामांमध्ये त्यांच्याकडून दिरंगाई होत असल्याचे आढळले आहे. मजुर सोसायट्या, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि मोठ्या ठेकेदारांनी ही कामे घेतली आहेत. त्यापैकी काही ठेकेदारांनी कार्यारंभ आदेश मिळूनही काम सुरु केलेले नाही. काही ठेकेदारांनी कामाची मुदत संपली, तरी शुभारंभाचा नारळ फोडलेला नाही. काही ठेकेदारांनी कामे अर्धवट सोडली आहेत, तर काहींची कामे अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात झाली आहेत.कामे रखडत ठेवणाऱ्या ठेकेदारांना पाणीपुरवठा विभागाने वेळोवेळी नोटिसा बजावल्या आहेत. त्यानंतरही सुधारणा न झाल्याने त्यांच्यावर दंडाची आकारणी केली आहे. गेल्या जानेवारीपासून अशा १०० ठेकेदारांवर दंडाच्या कारवाया करण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता संजय येवले यांनी सांगितले.काळ्या यादीत टाकण्याचा इशारापाडळी (ता. शिराळा) येथे पाण्याच्या टाकीचे काम मुदतीनंतरही पूर्ण न करणाऱ्या नीलम शिवाजी लवटे (रा. बुधगाव) या सुशिक्षित बेरोजगार अभियंता ठेकेदाराला जिल्हा परिषदेने काळ्या यादीत टाकले. पुढील तीन वर्षे त्यांना जिल्हा परिषदेचे कोणतेही काम मिळणार नाही. कामे गतीने पूर्ण न करणाऱ्या आणखी काही ठेकेदारांवर अशा कारवाईची शक्यता आहे.जलजीवन योजनेची कामे गतीने होण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. कामात दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. काही ठिकाणी जागा न मिळणे, स्थानिक राजकारण किंवा अन्य प्रतिकूल कारणांनी कामे रखडत आहेत. अशा ठिकाणी कारवाई केली जात नाही. पण कोणतेही सबळ कारण नसतानाही कामे रखडल्यास कारवाईशिवाय पर्याय नाही.

## बच्चू कडूंचा रवी राणांना इशारा

**अमरावती :** अचलपूरचे आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष महायुतीमधील सदस्य पक्ष असला तरा बच्च कडूंचा गेल्या काही महिन्यांपासून महायुतीशी संघर्ष चालू आहे. कडू यांनी भारतीय जनता पार्टीवरील त्यांची नाराजी सातत्याने बोलून दाखवली आहे. भाजपा महायुतीतल्या छोट्या पक्षांना योग्य पद्धतीने वागवत नसल्याचा आरोपही कडू यांनी अनेक वेळा केला आहे. तसेच अमरावतीत बच्चू कडू आणि विद्यमान खासदार तथा भाजपाच्या अमरावती लोकसभेच्या उमेदवार नवनीत रणा यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष चालू आहे. भाजपाने नवनीत राणा यांना लोकसभेची उमेदवारी देताना मित्रपक्षांचं म्हणणं ऐकून घेतलं नाही, असा आरोप बच्चू कडू यांनी केला आहे. त्यामुळे बच्चू कडू यांनी अमरावतीत प्रहारकडून दिनेश बूब यांना लोकसभेचं तिकीट दिलं आहे. अमरावतीत नवनीत राणा, त्यांचे पती आणि बडनेराचे आमदार रवी राणा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपाचा प्रचार करत आहेत. तर बच्चू कडू हे दिनेश बूब यांचा प्रचार करत आहेत. या प्रचारादरम्यान, राणा दाम्पत्य बच्चू कडूंवर आणि बच्चू कडू राणा दाम्पत्यावर टीका करत आहेत.

आमदार रवी राणा यांनी प्रचारादरम्यान प्रहारचे उमेदवार दनेश बूब यांच्यावर टीका केली होती. तसेच ते जुगार खेळतात, मद्यप्राशन करतात असा आरोपही केला होता. या आरोपांना आता आमदार बच्चू कडू यांनी उत्तर दिलं आहे. बच्चू कडू म्हणाले, रवी राणांनी दिनेश बूब किंवा इतर कुठल्याही नेत्यावर व्यक्तीगत टीका करू नये. आम्ही जर त्यांच्या व्यक्तीगत गोष्टी बाहेर काढल्या तर ते त्यांना कठीण जाईल. त्यामुळे त्यांनी असं करू नये. सार्वजनिक जीवनात तो माणूस म्हणजेच दिनेश बूब हा रवी राणांपेक्षा लाख पटीने चांगला आहे. त्यांनी ज्या पद्धतीने कामं केली आहेत ते पाहता मला नाही वाटत की, रवी राणा हे त्यांची बरोबरी करू शकतील. आपण तर त्यांचे (नवनीत राणा) चित्रपटातले सीन (प्रसंग) पाहिले तर त्यात ते खुलेआम मद्यप्राशन करताना दिसतात. मात्र आम्ही या गोष्टी काढायला नाही पाहिजेत आणि आम्ही तो नियम पाळतो. तुम्ही इतक्या खालच्या पातळीवर जात असाल तर तुमच्याही गोष्टी बाहेर येतील. व्यक्तिगतरित्या इतक्या खालच्या पातळीवर जाऊन आरोप करणं योग्य नाही.

बच्चू कडू म्हणाले, नवनीत राणा यांना पाडण्यासाठी सर्वात मोठा हातभार कोणाचा असेल तर तो रवी राणांचा अशेल. त्यांची जी भाषा आहे आणि ते व्यवस्थित वागले असते तर ही वेळ आली नसती. पण आता नवनीत राणा यांना निवडणुकीमध्ये पाडण्याचे श्रेय रवी राणा यांना जाईल.

दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावतीतल्या दर्यापूर नवनीत राणांच्या प्राचार्थ आयोजित सभेला संबोधित करताना महायुतीतल्या सर्व प्रमुख नेत्यांचा आणि पक्षांचा उल्लेख केला. मात्र फडणवीसांनी बच्चू कडू आणि त्यांच्या पक्षाचा उल्लेख करणं टाळलं. त्यामुळे बच्चू कडूंच्या पक्षाला महायुतीतून बाहेर काढल्याची चर्चा रंगू लागली आहे. यावरही बच्चू कडूंनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी आमचा उल्लेख केला नाही, आमच्या पक्षाचं नाव घेतलं नाही याबाबत मी त्यांचा आभारी आहे.

## भारतीय नौदलाने पूर्व किनारपट्टीवर केला पूर्वी लहर युद्धसराव

**दिल्ली :** भारतीय नौदलाने पूर्व नौदल कमांडच्या प्रमुख ध्वज अधिकाऱ्यांच्या परिचालनात्मक नियंत्रणाखाली 'पूर्वी लहर' हा युद्धसराव केला. या भागातील सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी नौदलाच्या सज्जतेचे मूल्यम ापन करण्याच्या उद्देशाने या सरावाचे आयोजन करण्यात आले.

या युद्धसरावात जहाजे, पाणबुड्या, विमाने आणि विशेष दले सहभागी झाली. विविध टप्प्यांमध्ये या सरावाचे आयोजन झाले. युद्धकौशल्याच्या डावपेचांच्या टप्प्यात वास्तविक युद्धासारख्या स्थितीत लढाईचा सराव आणि शस्त्रास्त्रांच्या टप्प्यात विविध प्रकारच्या भडीमाराचे यशस्वी प्रदर्शन या बाबींचा यामध्ये समावेश होता. यामधून निर्धारित लक्ष्यापर्यंत दारुगोळा पोहोचवण्याची भारतीय नौदलाची क्षमता सिद्ध झाली. विविध ठिकाणांहून विमानांचे परिचालन करून या संपूर्ण भागातील कारवाईदरम्यान सातत्यपूर्ण सागरी दक्षता प्रदर्शित करण्यात आली. पूर्व नौदल कमांडच्या सर्व प्रकारच्या युद्धसामग्रीच्या सहभागासह या सरावात अंदमान निकोबार कमांड, तटरक्षक दल आणि भारतीय हवाई दलाचा देखील सहभाग होता, ज्यामधून या संरक्षण दलांमधील उच्च दर्जाची आंतर परिचालन क्षमता दिसून आली.

या सरावामुळे वास्तविक परिस्थितीची हाताळणी करण्याचे धडे सहभागी दलांना मिळाले, ज्यामुळे या भागातील सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रभावी पद्धतीने प्रतिसाद देण्याची त्यांची क्षमता वृद्धिंगत झाली.

'पूर्वी लहर' या युद्धसरावाच्या यशस्वी समारोपामधून सागरी क्षेत्रातील वाढत्या सुरक्षाविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज असलेल्या भारतीय नौदलाचा दृढनिर्धार अधोरेखित झाला.

## लोकसभा निवडणुकीसाठी १९८ लालपरी दोन दिवस बुक, प्रवाशांना बसणार फटका



**अकोला :** अकोलालोकसभा मतदारसंघासाठी दुसऱ्या टप्प्यात शुक्रवार, २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून, मतदान पथकांना जिल्ह्यातील मतदान केंद्रांपर्यंत २५ एप्रिल रोजी नेऊन सोडणे व २६ एप्रिल २०२४ रोजी निवडणूक मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर त्यांना परत घेऊन येण्यासाठी जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात एकूण २३० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) १९८ बसेसचा समावेश असल्याने दोन दिवस प्रवाशांची अडचण होणार आहे.अकोला लोकसभा मतदारसंघात म्हणजे २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून, त्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. मतदानापूर्वी आवश्यक असलेली सर्वच तयारी अंतिम टप्प्यात असून, इव्हीएमवर मतपत्रिका सिलिंग करण्याची प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. अकोला लोकसभा मतदारसंघात एकूण २ हजार ५६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. स्टाँगरूममध्ये ठेवलेले ईव्हीएम युनिट यादृच्छिकरण पद्धतीने वितरीत करण्यात येणार आहेत.मतदानापूर्वी प्रशासनाने सर्वच तयारी पूर्ण केली असून, निवडणुकीच्या कामात व्यत्यय येऊ नये, यासाठी वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी एसटी महामंडळाकडे अकोला जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांसाठी २००, तर वाशिम जिल्ह्यातील रिसोड विधानसभा मतदारसंघासाठी ११० अशा एकूण ३१० बसेसची मागणी करण्यात आली होती. यापैकी अकोला जिल्ह्यासाठी १९८ बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विधानसभा मतदारसंघनिहाय बसेसची व्यवस्था

अकोला पूर्व : ५०
अकोला पश्चिम : १३
अकोट : २६
बाळापूर : ५४
मूर्तिजापूर : ५५ प्रवाशांचे होणार हाल

निवडणूक कामासाठी मतदान पथकातील कर्मचारी व इतरांना साहित्य ने-आण करण्यासाठी एसटी महामंडळाच्या बससह इतर खासगी बसची व्यवस्था प्रशासनाने केली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या एक दिवस आधी व निवडणुकीच्या दिवशी प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता

## एवढा आत्मविश्वास होता तर घरातलाच उमेदवार द्यायचा होता, एक तुमचे नातू...; सुजय विखे यांचा पवारांवर पलटवार

निलेश लंके यांना उमेदवारी देऊ नका असा निरोप महसूलमंत्र्यांनी एका उद्योजकाकडून पाठवला होता, असा गोप्यस्फोट करतशरद पवारयांनी शुक्रवारी नगरमध्ये राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला होता. यानंत आता,सुजय विखेयांनीशरद पवारांनाप्रत्युत्तर देत पलटवार केला आहे.सुजय विखेम्हणाले, तुमच्यामध्ये आत्मविश्वास होता, मग तुमच्या पक्षात दोन आमदार होते. एक तुमचे नातू (रोहित पवार) आहे, एक माजी मंत्री आहेत, तरीसुद्धा तुम्हाला बाहेरून उमेदवार घ्यावा लागतो आणि हे दोन लोक उभे राहायला तयार झाले नाही. एवढा तुमच्यात आत्मविश्वास होता, तर घरचाच उमेदवार द्यायला हवा होता. आत्मविश्वास कुणाचा डगमगलाय? याचे आत्मचिंतन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने करायचा विषय आहे. हास्यास्पद विनोद, ऐकावा आणि सोडून द्यावा -



हे भाषण पश्चिम महाराष्ट्रात चाललं असतं अहिल्यानगरमध्ये हे भाषण चालू शकत नाही. चाळीस वर्ष ज्या व्यक्तींबरोबर आमच्या कुटुंबाचा संघर्ष आहे. चाळीस वर्षांत निरोप पाठवला नाही. आज कशाला पाठवणार. यामुळे मी तुम्हाला विश्वासाने सांगतो की, या गोष्टीवर कुणीही विश्वास ठेऊ शकत नाही.

त्यामुळे हा हास्यास्पद विनोद म्हणून लोकांनी ऐकावा आणि सोडून द्यावा, असा टोमणाही सुजय विखे यांनी यावेळी पवारांना हाणला.राधाकृष्ण विखे पाटील यांनीही दिले होते प्रत्युत्तर -

यासंदर्भात बोलताना विखे पाटील म्हणाले होते, शरद पवार यांच्या विधानाला मी फारसे महत्व देत नाही. कारण खोटं बालणे हा त्यांचा धंदाच झाला आहे. पवारांच्या धोरणात कुठे सातत्य आहे. कधी पाहाटे शपथविधी घ्यायला सांगतात, तर कधी भजपाला पाठींबा देऊ काढून घेतात. काँग्रेसमध्ये विदेशी मुद्यावरून ज्यांच्याशी फारकत घेतली,

त्यांच्याच पायाशी जाऊन बसयाचे. त्यामुळे त्यांच्या पक्षातील सगळे त्यांना सोडून गेले असून, पवार यांनी आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. जिल्ह्यातील सर्व नेते एकत्र होते. मात्र पवार यांनी नेत्यांमध्ये भांडणे लावली. त्यामुळे जिल्ह्यातील पाणी, उद्योग, हे प्रश्न प्रलंबित असून, जिल्ह्याची पिच्छेहाट झाली आहे, अशी टीका विखे पाटील यांनी केली आहे.

## उमेदवार पाडापाडीची ट्रीक, चौरंगी लढतीत डमी उमेदवारांची गर्दी, हातकणंगलेत २ सत्यजित, २ धैर्यशील

**हातकणंगले :** निवडणुकीत विजयी होण्यासाठी नेत्यांकडून वेगवेगळ्या खेळ्या सुरुच असतात. काही वेळेस मतविभाजन करुन विजय मिळवणे, हा पर्यायही नेत्यांना आजमावून पाहतात. असाच प्रकार हातकणंगले लोकसभा मतदारसंघात करण्यात आलाय. हातकणंगले लोकसभा मतदारसंघात पाडापाडीच्या राजकारणाला वेग आलाय. ठाकरेंचे उमेदवार सत्यजित पाटील आणि शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या नावाशी साधर्म्य असणारे लोक शोधून त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे.

डमी उमेदवाराचा राजू शेट्टींना बसला होता फटका

२०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राजू शेट्टी यांना डमी उमेदवाराचा फटका बसला होता. बहुनज महापार्टीने राजू शेट्टी नाव असलेल्या उमेदवाराला निवडणुककीत उतरवले होते. त्यामुळे राजू शेट्टी यांना फटका बसला होता. डमी राजू शेट्टीने ८ हजार मतं खाल्ली होती.

**हातकणंगलेमध्ये चौरंगी लढत**

हातकणंगले लोकसभा मतदारसंघात चौरंगी लढत पाहायला मिळत आहे. ठाकरे गटाने सत्यजीत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून धैर्यशील माने पुन्हा एकदा मैदानात उतरले आहेत. याशिवाय राजू शेट्टी यांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतलाय. तर वंचित बहुजन आघाडीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डी. सी. पाटील यांना हातकणंगलेत उमेदवारी दिली आहे. प्रकाश आवाडे यांनी निवडणुकीत माघार घेतल्यानंतर हातकणंगलेमध्ये पंचरंगी लढत चौरंगी लढतीवर आली आहे.

**प्रकाश आवाडेंची लोकसभा निवड0णुकीतून माघार**

आमदार प्रकाश आवाडे यांनी लोकसभेतून शड्डू ठोकलाय. मात्र, आवाडेंचे बंड थंड करण्यात मुख्यमंत्री शिंदे यांना यश आलंय. मात्र, अगोदरच चौरंगी लढत असलेल्या हातकणंगलेमध्ये डमी उमेदवार डोकेदुखी वाढवू शकतात. त्यामुळे धैर्यशील माने आणि सत्यजित पाटील यांना डमी उमेदवारांचा फटका बसणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**राजू शेट्टींच्या विरोधात ठाकरेंकडून उमेदवार**

राजू शेट्टी आमच्या चिन्हावर निवडणूक लढवावी किंवा महाविकास आघाडीमध्ये सामील होऊन निवडणूक लढवावी, अशी ऑफर उद्धव ठाकरे यांच्याकडून देण्यात आली होती. मात्र, राजू शेट्टी यांनी ठाकरेंची ऑफर नाकारली. त्यानंतर ठाकरेंनी सत्यजित पाटील सरुडकर यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. शिवाय, निवडणुकीत त्यांना चांगला प्रतिसादही मिळताना दिसतोय.

# महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा पूर्ण ताकदीने प्रचार करणार

## शिवसेना ठाकरे गटाची करहर येथे बैठक



**राजदंड / सातारा**

सातारा लोकसभा मतदारसंघांमध्ये महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी असा जोरदार चुरशीचा सामना रंगणार आहे . महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादीने शरद पवार समर्थक शशिकांत शिंदे यांना रिंगणात उतरवले आहे त्यांच्या प्रचारासाठी सातारा जिल्ह्यातील ठाकरे गटाचे शिलेदार सक्रिय झाले असून महाविकास आघाडीचा उमेदवार पूर्ण ताकतीने निवडून देण्याची ग्वाही जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांनी दिली.

करहर तालुका जावळी येथे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली . या बैठकीला उपजिल्हाप्रमुख विश्वनाथ धनावडे शिवसेना पदाधिकारी सादिक बागवान, महिला संघटक सुनंदा महामुलकर, तालुकाप्रमुख नितीन गोळे, उमेश दुर्गवळे, प्रकाश गोळे, रवी पत्रे, सारिका गुजर, युवासेना अध्यक्ष जीवन शिंदे, इत्यादी शिवसैनिक उपस्थित होते. महाविकास आघाडीने जो उमेदवार दिला आहे त्याचा पूर्ण ताकतीने प्रचार करावयाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे असे मोहिते यांनी सांगितले.

ही सर्व प्रचार यंत्रणा शिवसेना उपनेते प्राध्यापक नितीन बानुगडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबणार आहे .शिवसेनेच्या वतीने प्रचारमेळावे, घरटी संपर्क अभियान, त्याचबरोबर उद्धव ठाकरे सरकारने गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री म्हणून जे निर्णय घेतले ते लोकांपर्यंत पोहोचवणे तसेच प्रत्येक मतदार संघामध्ये बूथ लेवल पर्यंत काम करून त्याचे सशक्तिकरण मजबुतीकरण तसेच सेना सभासदांची संख्या वाढवणे इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. महाविकास आघाडीच्या वतीने साताऱ्यात भव्यशक्ती प्रदर्शन करण्यात आले होते त्यावेळेला सुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने यामध्ये हिरीरीने भाग घेतला होता यापुढे महाविकास आघाडीच्या सर्व प्रचार मोहिमांमध्ये आम्ही अग्रभागी राहणार असल्याचे आश्वासन सचिन मोहिते यांनी दिले आहे.

## निवडणूक निरीक्षक आर. अर्जुन यांचेकडून कोरेगाव मतदारसंघाची पाहणी!

**कोरेगाव :** केंद्रीय निवडणूक निरीक्षक आर. अर्जुन यांनी सातारा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव विधानसभा मतदारसंघाची आज पाहणी केली.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अभिजीत नाईक, तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, निवडणूक नायब तहसीलदार सारिका शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम इत्यादी अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

विविध ठिकाणी पाहणी करून त्यांनी आपला अभिप्राय दिला आणि सूचना दिल्या. संगम माहूली आणि क्षेत्र माहूली येथील मतदान केंद्रांना त्यांनी भेट दिली. तेथील मतदान केंद्रांची तयारी त्यांनी पाहिली. नंतर त्यांनी पुसेगाव स्थिर निगराणी पथक आणि मतदान केंद्र या दोन्ही ठिकाणी पाहणी केली. त्यांनी एकमेव संवेदनशील केंद्र असलेले नवलेवाडी २५१ या मतदान केंद्राला भेट दिली आणि सविस्तर चर्चा केली.

# पहिल्याच दिवशी पुनर्वसित चिंचणी ग्रामपंचायतीची १०० टक्के करवसुली

### जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत; सरपंचांच्या संकल्पनेला सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थांचे सहकार्य

**राजदंड / मसूर**

ग्रामपंचायत कर वसुलीसाठी विविध उपायोजना राबवल्या जातात. मार्च महिन्यात वर्षाअखेरीस करवसुलीसाठी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह ग्रामसेवक व कर्मचाऱ्यांना वारंवार हेलपाटे मारावे लागतात. कडक कारवाई अमलात आणली तरी १००% कर वसुलीत दुर्मिळपणा पाहायला मिळतो. मात्र, याला अपवाद ठरले आहे पुनर्वसित चिंचणी (ता. कराड) हे गाव.



चिंचणी गावची कर वसुली दरवर्षी ३१ मार्चला शंभर टक्के करण्याची परंपरा अनेक वर्षापासून जपली आहे. मात्र यावर्षी अनोखा विक्रम या गावाने केला. या आर्थिक वर्षाची शंभर टक्के वसुली १ एप्रिल २०२४ रोजी पूर्ण करण्याची किमया या गावाने साधली. लोकनियुक्त व कर्तव्यदक्ष सरपंच नितीन बजरंग सावंत, ग्रामसेविका सौ. आशा मोहिते यांनी वर्षाच्या पहिल्याच दिवशी शंभर टक्के कर वसुली करण्याची संकल्पना ग्रामसभेत मांडली होती.त्या संकल्पनेला ग्रामपंचायत सदस्य प्रमोद शेलार, सौ सरिता शिराळे, सौ पार्वती सावंत,सौ. शांताबाई सावंत, हणमंत सावंत या सर्व सदस्यांनी या संकल्पनेला सहकार्य केले. तसा ठरावही २६ जानेवारी २०२४ च्या ग्रामसभेत ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आला. पुढील आर्थिक वर्षाची कर वसुली ग्रामपंचायतचे कर्मचारी संतोष अनपट यांनी ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यास सुरुवात केली. १ एप्रिलला १ लाख ११ हजार एवढी शंभर टक्के करवसुली यशस्वी झाली. संगणक ऑपरेटर विद्या चव्हाण व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

**■ शंभर टक्के कर वसुली उपक्रमाचे कौतुक...**

सातारा - सांगली जिल्ह्यातील शेतीला पाणी मिळावे म्हणून स्वतःच्या अनेक वर्षे थाटलेल्या संसाराचा त्याग करत मेढा तालुक्यातील पुनर्वसित झालेल्या चिंचणी गावाने पहिल्याच दिवशी शंभर टक्के करवसुली केली. इतर ग्रामपंचायतीसमोर आदर्श ठेवला आहे. लोकनियुक्त सरपंच, ग्रामसेविका व सर्व सदस्यांनी राबवलेल्या उपक्रमाचे जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

**■ कर वसुलीची कौतुक... मात्र बक्षीस नाही**

एखाद्या ग्रामपंचायतीने १००% करवसुली केली तर हा कौतुकाचा विषय होतो. शासनाच्या तिजोरीत त्वरित रक्कम जमा होती. मात्र शासनाचे प्रोत्साहनपर बक्षीस या उपक्रमासाठी नाही. केवळ कर वसुलीचे कौतुक होते... मात्र बक्षीस मिळत नाही. हीच मोठी खंत आहे.

# मतदान जागृतीसाठी कोरेगावला विद्यार्थ्यांची उत्साहात रॅली!

**राजदंड / कोरेगाव**

'लोकशाहीचा करू सन्मान, जीवनात सुख समाधान', 'आपले मतदान, लोकशाहीचा प्राण', 'अवश्य मतदान करा, लोकशाही बळकट करा' अशा विविध घोषणा देत हजारो विद्यार्थ्यांनी कोरेगावात मतदान जनजागृतीचा महत्त्वाचा संदेश समाजाला दिला. हे विद्यार्थी स्वतः सध्या मतदार नसूनही त्यांनी मतदारांना जागृत करण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. त्यामुळे समाजात मतदान जनजागृतीची एक नवीन लहर निर्माण होईल, अशा भावना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अभिजीत नाईक यांनी व्यक्त केल्या.




यावेळी तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, निवडणूक नायब तहसीलदार सारिका शिंदे, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

कोरेगाव मतदारसंघातर्फे सातारा लोकसभा निवडणुकीसाठी मतदान जनजागृतीचे विविध प्रयोग केले जात आहेत. सर्वसामान्य जनतेमध्ये मतदानाची जागृती व्हावी यासाठी सर्व स्तरांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न स्पर्धा, व्याख्याने, रॅली आदी माध्यमातून केले जात आहेत.

विद्यार्थी हा समाजाचा महत्त्वाचा घटक असून विद्यार्थी स्वतःच्या पालकांना, नातेवाईकांना, शेजाऱ्यांना मतदानाचे महत्त्व सांगणेस सक्षम असतात. हा धागा पकडून विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा आपल्या लोकशाहीच्या आणि मतदानाचे महत्त्व ठसवले जात आहे. जेणेकरून हे विद्यार्थी भावी नवमतदार म्हणून आपली मतदानाची भूमिका बजावतीलच. शिवाय लोकशाहीचे महत्व त्यांच्या मनात रुजेल आणि त्यामुळे विद्यार्थी संपूर्ण समाजात मतदानाचे महत्त्व अधोरेखित करतील, असे विचार तहसीलदार डॉ.संगमेश कोडे यांनी व्यक्त केले.

भारताविषयीचा अभिमान, लोकशाहीविषयीचा सन्मान विद्यार्थ्यांच्या जीवनात रुजविणे आवश्यक आहे. त्यांना राज्यघटना, देशप्रेम आणि त्या अनुषंगाने मतदानाचे महत्त्व समजावून सांगणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत निवडणूक नायब तहसीलदार सारिका शिंदे यांनी केले.

मुख्याध्यापक श्री. बर्गे तसेच शिक्षक यांनी ही रॅली यशस्वी होण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांनी यावेळी माझा भारत महान आहे आणि तो अबाधितपणे महान राखण्यासाठी आम्ही आटोकाट प्रयत्न करू, अशा भावना व्यक्त केल्या.

# 'कराड मर्चंट'ला १३ कोटी ४५ लाखांचा ढोबळ नफा

**राजदंड / कराड**

सहकाराची ओळख असलेल्या कराड मर्चंट सहकारी क्रेडीट संस्थेने नुकत्याच संपलेल्या सन २०२३-२४ या अर्थिक वर्षात गतवर्षीच्या तुलनेत ठेव व कर्जात १० टकके ऐवढी प्रशंसनीय वाढ केली असून संस्थेचा एकत्रित व्यवसाय ७७५ कोटी रुपयांचा झाला आहे. तर संस्थेला १३ कोटी ४५ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला असून संस्थेची ५०० कोटींच्या ठेवीकडे वाटचाल सुरु असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक सत्यनारायण मिणीयार यांनी दिली.

कराड मर्चंटने चालू वर्षी सर्व सभासदांच्या सहकार्याने संस्थेची गुणात्मक वाढ करीत संस्थेकडे ३१२ कोटींची कर्जे वितरीत केली असून गत वर्षीच्या तुलनेत वसुली कारवाई व सततचा संपर्क गतिमान ठेवल्याने नकत एन. पी. ए. शुन्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाची गंतवणुक संस्थेच्या ठेवी ४६३ कोटींच्या झाल्या आहेत. तर संस्थेला १३ कोटी ४५ लाखांचा ढोबळ नफा झाला आहे. संस्थेने विविध बॅकेत २७५ कोटींची गुंतवणूक केली असून संस्थेकडे २० कोटी २७ लाख रुपयांचे भागभांडवल आहे. या वर्षाअखेरीस संस्थेचे ३१ हजार ७०० सभासद आहेत. तसेच एन. पी. ए. ही शुन्य टकके ठेवण्यात यश मिळाले आहे. संस्थेचे कामकाज विविध २७ शाखांतून सुरु असून १८ शाखा स्व:मालकीच्या जागेत कार्यरत आहेत.

श्री. मिणीयार म्हणाले, बँकीग क्षेत्रात इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी आदी नवनवीन सेवा, सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून, चालू वर्षी संस्थेने वाहन तारण कर्जास विशेष ९ टक्के व्याजदाराची योजना सुरु केली आहे. त्याचाही सर्व ग्राहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे अवाहनही त्यांनी केले आहे.

# इंदूर राजघराणेचे वारस काळगावडे राजेंनी घेतले शिंगणापूरच्या शंभू महादेवाचे दर्शन

**राजदंड / दहिवडी**

शिखर शिंगणापूर, ता. माण येथे चैत्र शु.एकादशीला इंदूर राजघराणेचे वारस कालगावडे राजे यांनी रीतीरीवाजाप्रमाने घोड्यावरून बसुन वाजत गाजत येवुन शंभू महादेवाचे दर्शन घेतले. आज या राजाचा मान असतो, त्यांनी पादत्राणे घालुन गाभाऱ्यात जावुन दर्शन घेतले.



चैत्र शु. अष्टमीला शिव पार्वती विवाह सोहळा पार पडला. आख्यायिकेनुसार याविवाह सोहळ्याला त्याकाळी इंदूरच्या राजाला लग्नाचे निमंत्रण दिले गेले नव्हते.म्हणून एकादशी दिवशी येवून निमंत्रण दिले नसल्याने देवाचा निषेध केला होता. आणि आतापर्यंत चालत आलेल्या परंपरेनुसार कालगावडे राजे हे त्यांचे वंशज घोड्यावरुन पायात पादत्राणे घालून थेट मंदिराच्या गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेवुन भक्तिरूपी निषेध करतात. आज सकाळी कालगावडे राजांनी पुष्कर तलावात स्नान केले. त्यानंतर उमाबनातील नांद्रुकिच्या झाडाखालि बसून कांदा,चटणी आणि भाकरी खाल्ली व न्याहारी केली..इंदूर राजघराणेचे वारसदार माळेगाव पो. राक्षी (ता. शेवगाव जि. अहमदनगर) गणेश सुखदेव कालगावडे यांनी पादत्राणासह मंदिरात जावून शिवलिंगावर बेल, फुल, दवणा विभूती (भस्म) वाहिले व माना-पाना प्रमाणे दर्शन घेंतले.

आज सर्व शिवभक्त एकादशी निमित्त उपवास करतात मात्र ते न्याहारी करतात. रीतीरीवाजाप्रमाणे कालगावडा राजांनी आज पारंपारिक पध्दतीने घोड्यावरून येवून दर्शन घेतले. महादेवाच्या मंदिरात जावून येवून त्यांच्याबरोबर आलेल्या भाविकांनि महाप्रसाद घेतला. कालगावडे राजे यांच्याबरोबर नगर जिल्हातील सुमारे ९० गावातील भक्त भाविक त्यांच्या समवेत दरवर्षी येत असतात.

कालगावडे राजे हे एकादशीच्या अगोदर आपल्या लवाजम्यासह शिंगणापूरात दाखल होत असतात. ते गावाच्या वेशीच्या बाहेर डोंगरावर मुक्कामी असतात.

# महायुती राष्ट्रवादीस विश्वासात घेत नाही!

### जावळी तालुकाध्यक्ष साधू चिकणे यांचा आरोप

**राजदंड / मेढा**

सातारा लोकसभा मतदारसंघाची महायुतीची उमेदवारी छत्रपती उदयनराजे भोसले यांना जाहीर होऊन त्यांनी शक्ती प्रदर्शनाने अर्ज दाखल केला. मात्र याच महायुतीत सहभागी असलेल्या राष्ट्रवादी (अजित पवार गटास) सातारा विधानसभा मतदारसंघातील भाजप नेतृत्वाकडून विश्वासात घेत नसल्याचा आरोप जावळी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष साधू चिकणे यांनी केला असून यामुळे महायुतीच्या उमेदवारास याचा फटका बसण्याचे संकेत देखील त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहेत.

राज्यात महायुती एकत्रितपणे लोकसभा निवडणूक लढवीत आहे. मात्र सातारा लोकसभा मतदारसंघात मोडणाऱ्या सातारा विधानसभा मतदारसंघातील सातारा व जावळी तालुका राष्ट्रवादी पक्षास सातारा विधानसभा मतदारसंघातील भाजप नेतृत्व कोणत्याही गोष्टीत विश्वासात घेत नाही .याबाबत पक्षश्रेष्ठींकडे पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करून देखील अद्याप दोन्ही तालुक्यातील राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेत नसल्याचा आरोप प्रसिद्धी पत्रकाद्वारे साधू चिकणे यांनी केला आहे.



एकीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे हे जावळी तालुक्यातील भूमिपुत्र आहेत.त्यांच्याबाबत स्थानिक मतदारांमध्ये सहानुभूतीचे वातावरण असताना भाजप नेतृत्वास जावळी तालुक्यात अधिकचे लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. मात्र भाजप नेतृत्वाकडून हे होताना दिसून येत नाही. याचा प्रत्यय शेंद्रे येथील महायुतीच्या मेळाव्यात देखील पाहायला मिळाला.

तरी देखील भाजप नेतृत्वाकडून राष्ट्रवादी सातारा तालुका अध्यक्ष व जावळी तालुकाध्यक्ष तसेच दोन्ही तालुक्यातील पदाधिकाऱ्यांशी कोणताही सुसंवाद केला जात नाही. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. याचा फटका महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले यांना बसू शकतो, त्यामुळे भाजप नेतृत्वाने राष्ट्रवादीस यापुढे विश्वासात न घेतल्यास यापुढील कोणत्याही निवडणूक प्रक्रियेत राष्ट्रवादी (अजित पवार गट) सहभागी होणार नाही. असा इशारा देखील साधू चिकणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले... कडब्याचा दर दोन ते अडीच हजार रुपये

### मक्याचा चाराही महागला....

**राजदंड / मसूर**

साखर कारखान्यांचा गळीत हंगाम यंदा मार्चअखेर संपल्याने जनावरांना मिळणारे उसाचे वाडे बंद झाले. या पार्श्वभूमीवर कडब्याचा दर दोन ते अडीच हजारावर गेला आहे. याबरोबर मकाही महागला आहे. त्यामुळे पशुपालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. एकंदरीत पशुधन सांभाळताना बळीराजा मेटाकुटीला आला आहे.

एकीकडे दूध उत्पादकांना मिळणारा दर दिवसेंदिवस कमी होत असताना पशुखाद्य व चारा महाग होत असल्याने शेतकऱ्यांना पशुधन सांभाळणे अवघड झाले आहे. पुरेसा पाऊस न झाल्याने माळभागावरची पिके वाळून गेली. यावर्षी ओल्या चाऱ्याबरोबरच शेतकऱ्यांना सुक्या चाऱ्याचा प्रश्न भेडसावत आहे. मसूर, किवळ, निगडी, अंतवडी, रिसवड आदी गावांमध्ये कडब्याचा दर २००० ते २५०० रुपयांपर्यंत शेकडा पेंडी असा आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पाचपेक्षा जास्त जनावरे आहेत ते पावसाळ्यापूर्वी वैरण मोठ्या प्रमाणात साठवून ठेवत असतात.



कडबा व मका या पिकांकडे जनावरांसाठी पोषक चारा म्हणून शेतकरी पाहत असतो. सध्या मागणी वाढल्यामुळे काही शेतकरी शेतामध्ये असणाऱ्या उभ्या ज्वारी व मका पिकांची विक्री करीत आहेत. त्यामुळे बळीराजा दुभत्या जनावरांसाठी ज्वारी व मक्याची खरेदी करीत आहेत.

यावर्षी कमी पावसामुळे शेतकऱ्यांनी आडसाली व सुरुची उसाची लागण केलेली नाही. त्यामुळे ओल्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनणार आहे. अनेक शेतकऱ्यांनी उसाची लागण किंवा खोडवा गेल्यानंतर रब्बी हंगामातील शाळू पीक घेतले होते. त्यामुळे काही अंशी सुक्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

**पावसाळ्यापूर्वी वैरणीची काळजी**

**पावसाळ्यापूर्वी वैरण मोठ्या प्रमाणात साठवून ठेवतात. अनेक शेतकऱ्यांची गावोगावी जाऊन कडबा व मका खरेदी करण्यासाठी पायपीट सुरू आहे. कडबा कुट्टी करून बॅगेत सुरक्षित ठेवून ती पावसाळ्यात वापरायची व जनावरांना चाऱ्याची टंचाई भासू द्यायची नाही यासाठी शेतकरी आतापासून कामाला लागला आहे.**

**पशूधन सांभाळणे झाले अवघड.....**

**दिवसेंदिवस पशूखाद्याचे दर वाढतच आहेत. त्यातच ओला व सुका चारा उपलब्ध होणे यावर्षी अवघड झाले आहे. कमी पाऊस झाल्याने विविध प्रकारच्या मूरघास वाढ योग्य प्रमाणात झालेली नाही. त्यातच पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याने पशुधन सांभाळणे अत्यंत अवघड झाले आहे.**

**– संदीप जाधव, शेतकरी हेळगाव.**

# एस.टी. कर्मचाऱ्यांची कोरेगावात मतदानाची शपथ



**राजदंड / कोरेगाव**


आपल्याला इच्छित स्थळी, इच्छित गावाला सुरक्षितपणे नेऊन सोडणाऱ्या आपल्या लाडक्या 'एसटी'चे महत्त्व अजूनही अबाधित आहे. याचे आज आधुनिक युगातही पदोपदी प्रत्यंतर येते. म्हणूनच सर्वसामान्य समाजाशी थेट जोडलेल्या एसटी कोरेगाव आगारामध्ये आज मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला. कोरेगाव आगारातील वर्कशॉपमधील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे मतदानाची शपथ घेतली आणि लोकशाही अधिक बळकट करण्याचा निर्धार केला.


कोरेगाव विधानसभा मतदारसंघातर्फे प्रशासन मतदान जनजागृतीसाठी आणि मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. स्पर्धा भाषणे व्याख्याने आदी माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. यावेळी वर्कशॉप विभागाचे प्रमुख शुभम ढाणे, वर्कशॉप मधील कर्मचारी तसेच जनजागृती पथकाचे प्रमुख यशेंद्र क्षीरसागर, पथकाचे सदस्य मंगेश घाडगे उपस्थित होते.

यावेळी या कर्मचाऱ्यांना मतदानाचे महत्त्व आणि मतदानाची लोकशाहीतील भूमिका याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# मसूरच्या पारवे बंधूंचे अभिरूप व मंथन परीक्षेत यश

**मसूर :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दुसरी इयत्तातील विद्यार्थी आयुष पारवे व पारस पारवे या दोन पारवे बंधूंनी भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षा, राज्यस्तरीय मंथन सामान्यज्ञान परीक्षांमध्ये उज्वल यश मिळवले.





राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान परीक्षेमध्ये आयुष पारवेने सातारा जिल्ह्यात ५ वा व राज्यात १० वा, पारस पारवे याने केंद्रात २ रा, जिल्ह्यात ९ वा व राज्यात १४ वा क्रमांक मिळवला. आयुषने भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये १५० पैकी १२८ व पारसने १५० पैकी ११८ गुण मिळवले. त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका कविता शिरसाट यांचे मान्यवरांनी अभिनंदन केले.

# health Insurance मध्ये वयोमर्यादा हटवली

**नवी दिल्ली :** आता तुम्ही तुमच्या वृद्ध पालकांसाठीही आरोग्य विमा (Health Insurance) सहज खरेदी करू शकता. विमा नियामक इरडाने (IRD-I) आरोग्य विमा खरेदीसाठी वयाची अट (-ge Bar) हटवली आहे.

हे १ एप्रिल २०२४ पासून लागू होणाऱ्या आरोग्य विमा पॉलिसींसाठी करण्यात आले आहे. याआधी ग्राहक केवळ ६५ वर्षे वयापर्यंत नवीन आरोग्य विमा पॉलिसी घेऊ शकत होते. आता कोणत्याही वयाची व्यक्ती नवीन आरोग्य विमा पॉलिसी घेऊ शकते.

IRD-I ने एका परिपत्रकात म्हटले आहे की, विमा कंपन्यांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की त्यांच्याकडे सर्व वयोगटातील लोकांसाठी विमा उत्पादने आहेत. IRD-I च्या या निर्णयाचा उद्देश भारतात अधिक समावेशक आरोग्य सेवा प्रणाली तयार करणे आहे.

विमा कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांच्या श्रेणीमध्ये विविधता आणण्यासाठी प्रोत्साहित करणे आहे. विमा नियामकाने आरोग्य विमा पुरवठादारांना ज्येष्ठ नागरिकांसारख्या लोकांसाठी पॉलिसी तयार करण्याचे आणि त्यांचे दावे आणि तक्रारी हाताळण्यासाठी समर्पित चॅनेल तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

IRD-I च्या निर्णयामुळे आता ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे लोक देखील नवीन आरोग्य विमा पॉलिसी घेऊ शकतील. या निर्णयाचे उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी स्वागत केले आहे.

कर्करोग, हृदय आणि एड्ससारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना पॉलिसी देण्यास नकार देण्यासही विमा कंपन्यांना या परिपत्रकात प्रतिबंधित करण्यात आले आहे. परिपत्रकानुसार, IRD-I ने आरोग्य विमा प्रतीक्षा कालावधी देखील कमी केला आहे.

हा ४८ महिन्यांऐवजी ३६ महिने करण्यात आला आहे.

# ऐन प्रचारादरम्यान राहुल गांधींची प्रकृती बिघडली, काही प्रचारसभा रद्द

लोकसभा निवडणुकीचा प्रचार ऐन रंगात आला असतानाच काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांची प्रकृती बिघडली असून, प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना मध्य प्रदेशचा सटणा दौरा रद्द करावा लागला आहे. ऐन प्रचारादरम्यान राहुल गांधींची प्रकृती बिघडली, काही प्रचारसभा रद्द, समोर येतेय अशी अपडेट लोकसभा निवडणुकीचा प्रचार ऐन रंगात आला असतानाच काँग्रेसचा मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचेज्येष्ठ नेतेराहुल गांधीयांची प्रकृती बिघडली असून, प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना मध्य प्रदेशचा सटणा दौरा रद्द करावा लागला आहे. आता राहुल गांधीयांच्या ऐवजी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे सटणाच्या दौऱ्यावर जातील.

याबाबत माहिती देताना काँग्रेसचे मध्य प्रदेशमधील प्रदेशाध्यक्ष जितू पटवारी यांनी सांगितले की, राहुल गांधी हे प्रकृती अस्वस्थ्यामुळे आज सटणा येथे येऊ शकणार नाहीत. अशा परिस्थितीत त्यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना सटणा येथे दौरा करण्याची विनंती केली आहे. आता सटणा येथील काँग्रेस उमेदवार सिद्धार्थ कुशवाहा यांच्या प्रचारासाठी होणाऱ्या सभेला मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित राहणार आहेत. तसेच राहुल गांधी यांच्या लवकरच राज्यात प्रचारसभा होणार आहेत. तसेच ते जनतेशी संवाद साधणार आहेत. काँग्रेसच्या मीडिया सेलचे प्रभारी जयराम रमेश यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, राहुल गांधी आज सटना आणि रांचीमध्ये प्रचारासाठी जाणार होते. तिथे इंडिया आघाडीची सभा होणार आहे. मात्र राहुल गांधी हे अचानक आजारी पडले आहेत. तसेच सध्या ते दिल्लीमधून बाहेर जाऊ शकत नाहीत. मात्र राहुल गांधी यांच्या अनुपस्थितीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे सटना येथे सभेला संबोधित करणार आहेत.मध्य प्रदेशमध्ये पहिल्या टप्पातील मतदान होत आहे. दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी सटना येथे मतदान होणार आहे. तिथेच प्रचारसभेसाठी राहुल गांधी हे येणार आहेत. मात्र प्रकृती अस्वस्थ्यामुळे राहुल गांधी यांचा दौरा रद्द करावा लागला आहे. याआधी राहुल गांधी यांनी ८ एप्रिल रोजी मंडला आणि शहडोल येथे प्रचारसभा घेतल्या होत्या.

# जे शोभायात्रेला संरक्षण देऊ शकत नाहीत, ते भगिनींचे काय संरक्षण करणार?

## मुख्यमंत्री योगींचा हल्लाबोल



देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा एनडीएचे सरकार प्रचंड बहुमताने स्थापन होणार आहे. यात शंका नसावी.

ढहीेश ुहे लरपर्पी गींिशर्ली ींहश ींलिर्शीीळेप, हे ुळश्रश्र ींहशू गींिशर्ली ींहश ेींळींशीी रपव सळीश्री -ीींरलज्ञ ेष उहळशष चळपर्ळींशी धेसळ रवळींूर परींह । जे शोभायात्रेला संरक्षण देऊ शकत नाहीत, ते भगिनींचे काय संरक्षण करणार? मुख्यमंत्री योगींचा हल्लाबोल

जे शोभायात्रेला संरक्षण देऊ शकत नाहीत, ते भगिनींचे काय संरक्षण करणार? मुख्यमंत्री योगींचा हल्लाबोल

लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १० वर्षांच्या कार्यकाळाबद्दल लोकांच्या मनात प्रचंड उत्साह आहे आणि तो मतांमध्ये रूपांतरित होत आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा एनडीएचे सरकार प्रचंड बहुमताने स्थापन होणार आहे. यात शंका नसावी. जनतेकडूनच विरोधकांचा खोटारडेपणाही उघड पाडला जात आहे, असे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे, ते रविवारी त्यांच्या शासकीय निवासस्थानी माध्यमांशी बोलत होते.

तुष्टीकरणाच्या नावाखाली व्होट बँकेचे राजकारण -

एका प्रश्नाला उत्तरात देताना मुख्यमंत्री योगी म्हणाले, बिगरभाजप शासित राज्यांमधील हिंसाचार, हा तुष्टीकरणाच्या धोरणांचा दुष्परिणाम आहे. रामनवमी आणि होळीच्या दिवशी पश्चिम बंगालमध्ये तसेच बिगर भाजपशासित राज्यांमध्ये झालेल्या दंगली म्हणजे बहुसंख्य समाजाच्या भावनांशी खेळण्यासारखे आहे. तुष्टीकरणाच्या नावाखाली व्होट बँकेच्या राजकारणाने नेहमीच सांप्रदायिक तेढ निर्माण केली आहे.

पुढे बोलताना योगी म्हणाले, पश्चिम बंगालमधील रामनवमीच्या शोभायात्रांवर पुन्हा झालेले हल्ले चिंतेचा विषय आहे आणि देशातील जनतेसाठी एक संदेशही आहे की, हे लोक शांततापूर्ण शोभायात्रांना संरक्षण देऊ शकत नाहीत, तर भगिनींना आणि सामान्य नागरिकांना सुरक्षा देऊ शकतील का? निवडणूक ही तथाकथित धर्मनिरपेक्ष लोकांना आणि पक्षांना संदेश देण्याची सर्वोत्तम संधी असते. आपल्या मतातून यांना संदेश द्या की, आमच्या भावनांशी खेळाल आणि सुरक्षेचा भंग करणाऱ्यांना आश्रय द्याल तर, आम्हीही निवडणुकीतून त्याच पद्धतीने उत्तर देऊ.

# ५ निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी घसरुनही सनसनाटी निकाल!

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत यावेळी भाजप ४०० पारचा नारा देत प्रचार करत आहे. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दक्षिण भारतात अधिकाधिक जागा मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. भव्य रॅली सुद्धा काढल्या. एनडीएपेक्षा दक्षिणेत विरोधी इंडिया आघाडीची स्थिती चांगली असल्याचे दिसते. पहिल्या टप्प्यातील १०२ जागांपैकी दक्षिणेकडील जागांवर प्रचंड मतदान झाले आणि उत्तर भारतातील राज्यांमध्ये कमी मतदानाने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. काही लोक याला परिवर्तनाची हाक म्हणत आहेत, तर काही लोक जनतेला बदल नको असल्याचे सांगत आहेत.

उत्तर भारतीय राज्यांमध्ये कमी मतदान अडचण निर्माण करू शकते

जाणकारांच्या मते, उत्तर भारतातीमधील राज्यांमध्ये कमी मतदानामुळे भाजपचा तणाव वाढू शकतो. दिल्ली विद्यापीठातील प्रोफेसर राजीव रंजन गिरी सांगतात

## पहिल्याच टप्प्यात कमी मतदान;

की, मध्य प्रदेशात २०१९ मध्ये ७५ टक्के मतदान झाले होते, जे यावेळी ६३ टक्क्यांवर आले. त्याच वेळी, बिहारमध्ये ४७ टक्के मतदान झाले, जे गेल्या वेळच्या ५३ टक्क्यांपेक्षा ६ टक्के कमी आहे. यावेळी राजस्थानमध्ये ५७.८७ टक्के मतदान झाले, जे गतवेळच्या ६३.७१ टक्क्यांपेक्षा सुमारे ६ टक्के कमी आहे. यावेळी उत्तर प्रदेशात ज्या जागांवर मतदान झाले, तेथे २०१९ च्या निवडणुकीत सुमारे ६७ टक्के मतदान झाले. यावेळी केवळ ५७ टक्के मतदान झाले. या राज्यांमधील एवढा फरक कोणत्याही पक्षासाठी अडचणी निर्माण करू शकतो.

उत्तरेत कमी मतदान काय सांगते?

पब्लिक पॉलिसीचे प्राध्यापक आणि सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज (णएए) चे सह-संचालक संजय कुमार म्हणतात की, पहिल्या टप्प्यात जे काही मतदान झाले आणि मतदानाचा पॅटर्न, त्याचा काही विशेष परिणाम झालेला दिसत नाही. २०१९ मध्ये जशी भाजपची स्थिती होती, तशीच स्थिती यावेळीही दिसते. सगळीकडे मोदी आणि मोदींचीच चर्चा आहे. बिहार आणि मध्य प्रदेशात नक्कीच कमी मतदान झाले आहे, पण त्याचा फारसा परिणाम होणार नाही. असं असलं तरी, या मतदान पद्धतीच्या आधारे, सध्या कोणतेही संकेत देणं कठीण आहे. दक्षिण आणि ईशान्येत विक्रमी मतदान झाले आहे. याआधीही असेच मतदान झाले आहे.

कमी मतदानाचा अर्थ काय?

तज्ज्ञांच्या मते, काही वेळा लोकसभा निवडणुकीत कमी मतदानाचा अर्थ असा होतो की जनतेला कोणताही बदल नको आहे. दुसरे म्हणजे, हवामान देखील यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकते. उत्तर भारतात खूप उष्णता आहे. त्याचवेळी, काही लोकांचे असेही म्हणणे आहे की कमी मतदान हे सत्ता परिवर्तनाचे संकेत देऊ शकते. अशा स्थितीत कमी मतदान म्हणजे सत्तापरिवर्तन असा अंदाज बांधणे घाईचे ठरेल. बंपर मतदानानंतरही अनेकवेळा सत्तापरिवर्तन झाल्याचे दिसून आले आहे.

**५ निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी घसरली, ४ वेळा सरकार बदलले**

तज्ज्ञांच्या मते, देशातील गेल्या १२ सार्वत्रिक निवडणुकांपैकी ५ वेळा मतदानाच्या टक्केवारीत घट झाली आहे. यापैकी ४ वेळा सरकार बदलले आहे. कमी मतदान होऊनही सत्ताधाऱ्यांची फक्त एकदा वापसी झाली होती. १९८० च्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी घसरली आणि जनता पक्षाचे सरकार काँग्रेसच्या जागी आले. १९८९ मध्ये, मतदानाची टक्केवारी घसरली आणि व्हीपी सिंग यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडीचे सरकार काँग्रेसच्या जागी आले. १९९१ मध्ये पुन्हा मतदानाची टक्केवारी घसरली आणि काँग्रेसने सरकार स्थापन केले. १९९९ हे वर्ष असे होते की कमी मतदान होऊनही सत्ताबदल झाला नाही. त्यानंतर २००४ मध्ये मतदानात घट झाली आणि भाजपला हटवून काँग्रेस सत्तेवर आली.

**२०१९ मध्ये भाजपला २१ पैकी एकही जागा जिंकता आली नाही**

२०१९ च्या निवडणुकीत दक्षिण भारतात भाजपने ४० जागा जिंकल्या होत्या. द्रमुकने २४ जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसने १५ जागा जिंकल्या होत्या. १०२ जागांपैकी २१ जागांना स्विंग सीट्स म्हटले जात आहे, जिथे डीएमकेने २००९ आणि २०१९ मध्ये १३ जागा जिंकल्या होत्या. मात्र, २०१४ मध्ये परिस्थिती उलट झाली. यापैकी अखअऊचघ ने १२ जागा जिंकल्या, पण झचघ ने धरमपुरीची एक जागा जिंकली. यामध्ये भाजपला एकही जागा मिळाली नाही. गेल्या निवडणुकीत या राज्यांमध्ये भाजपची मतदानाची टक्केवारी ५ टक्क्यांहून कमी होती.

दक्षिणेकडील तामिळनाडू आणि केरळमध्ये धाकधूक

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तामिळनाडूत भाजपचे कमळ फुलू शकले नाही. द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीने (काँग्रेस आणि सीपीआय(एम) सह तामिळनाडूमधील एकूण ३९ जागांपैकी ३८ जागा जिंकल्या होत्या. त्याचवेळी अखअऊचघ ला फक्त एक जागा मिळाली होती. केरळमध्येही भाजपने अद्याप खाते उघडलेले नाही. गेल्या निवडणुकीत भाजपच्या मतदानाचा टक्का वाढलेल्या तीन जागा होत्या, मात्र त्या जागांचे विजयात रूपांतर होऊ शकले नाही. येथे एकूण २० जागांपैकी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ आघाडीने १५ जागा जिंकल्या होत्या. त्याचवेळी डाव्या पक्षांच्या आघाडीला केवळ १ जागा मिळाली होती. इंडियन युनियन मुस्लिम लीगला २ जागा, केरळ काँग्रेसला १ जागा आणि रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पार्टी, भाजपला एकही जागा मिळाली नाही.

# तुरुंगात भिडले कैदी, एकमेकांवर प्राणघातक हल्ला

## दोघांचा मृत्यू, दोघे गंभीर

**लुधियाना :** तुरुंगात कैद्यांमध्ये झालेल्या वादातून हाणामारीत दोघांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. पंजाबच्या संगरुर इथल्या जिल्हा तुरुंगात ही घटना घडली. कैद्यांनी एकमेकांवर धारदार शस्त्राने हल्ला केला. हल्ल्यानंतर चार कैद्यांना रुग्णालयात आणण्यात आले. यापैकी दोघांचा उपचारावेळी मृत्यू झाला. तर दोघे गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, संगरुर तुरुंगात असलेल्या ४ कैद्यांमध्ये वाद झाल्याची माहिती मिळताच प्रशासकिय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. हल्ल्यात चारही कैदी गंभीर जखमी झाले होते. चौघांना तात्काळ रुग्णालयात नेण्यातं आलं. पण उपचारावेळी दोघांचा मृत्यू झाला. चारही कैदी एकाच बराकीत होते अशी माहिती समोर येत आहे.

चारही कैद्यांच्या डोक्याला मार लागला आहे. मोहम्मद हरीष हर्ष, मोहम्मद शहबाज, धरमिंदर सिंह आणि गगनदीप सिंह अशी कैद्यांची नावे आहेत. यात उपचारावेळी हरीष आणि धरमिंदर यांचा मृत्यू झाला. शहबाज आणि गगनदीप यांचना गंभीर अवस्थेत पटियालाला पाठवण्यात आलं आहे.


रुग्णालयात कैद्यांचा उपचार सुरू असून त्यांना सुरुवातीला सरकारी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पटियालातील राजेंद्र हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे. पोलिसांनी कैद्यांमध्ये वादाचे कारण अद्याप सांगितलेले नाही. सर्वांच्या शरीरावर धारधार आणि टोकदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा आढळल्या आहेत. पोलिसांनी आता या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

# एव्हरेस्ट फिश करी मसाल्याविरुद्ध मोठी कारवाई; जास्त सेवनाने शरीराचे किती व कसे नुकसान होते?

**सिंगापूर :** सिंगापूर फूड एजन्सी ने गुरुवारी, एव्हरेस्टच्या फिश करी मसाला या लोकप्रिय भारतीय मसाल्याच्या ब्रँडची उत्पादने बाजारातून परत मागवून घेतली आहेत. या मसाल्यात इथिलीन ऑक्साईड हे एक कीटकनाशक आढळून आल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे समजतेय. सिंगापूर फूड एजन्सीने आयातदार एझ मुथिया आणि सन्स यांना सदर प्रकरणी निर्देश दिले आहेत.

नेमकं घडलं काय?

एसएफएने स्पष्ट केले की इथिलीन ऑक्साईड हे अन्नामध्ये वापरण्यासाठी सुरक्षित नसतानाही, काहीवेळा कृषी उत्पादकांकडून निर्जतुकीकरणासाठी याचा वापर रोपांवर केला जातो. जेव्हा या रोपांमधून पुढे विविध पदार्थ तयार होतात या इथिलीन ऑक्साईडचा काही अंश त्यातली शिल्लक राहू शकतो. काही तज्ज्ञांच्या माहितीनुसार, कमी प्रमाण असल्यास लगेचच याचा आरोग्याला धोका निर्माण होत नाही पण सातत्याने असे पदार्थ आपल्या शरीरात जात




असतील तर मात्र धोका संभवतो.

इथिलीन ऑक्साईडमुळे शरीराचे किती व कसे नुकसान होते?

आरोग्य व कल्याण विभागाच्या जनरल प्रॅक्टिशनर, डॉ. पृथा हाजरा यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, कमी प्रमाणात इथिलीन ऑक्साईडच्या संपर्कात येणे सुद्धा तितकेच घातक ठरू शकते. अल्पकाळात, व्यक्तींना श्वसनाच्या समस्या, डोकेदुखी, मळमळ, उलट्या किंवा सायनोसिसचा सामना करावा लागू शकतो. तर दीर्घकालीन परिणामांमध्ये प्रजनन समस्या, न्यूरोटॉक्सिसिटी, संवेदना आणि म्युटेजेनिक बदल यांचा समावेश होऊ शकतो. आश्चर्य म्हणजे असं असूनही वैद्यकीय उपकरणे निर्जतुक करण्यासाठी सुद्धा इथिलीन ऑक्साईड वापरले जाते.

डॉ हाजरा सांगतात की, कीटकनाशके, जेव्हा आपल्या अन्नसाखळीत प्रवेश करतात तेव्हा आरोग्यासाठी मोठ्या प्रमाणात धोका निर्माण करू शकतात. काही कीटकनाशकांच्या बाबत तर अगदी कमी प्रमाणात संपर्क सुद्धा तीव्र विषबाधेला कारण ठरू शकतो. यामध्ये अतिसार, निर्जलीकरण आणि त्वचेची जळजळ अशी लक्षणे दिसू शकतात.

डॉ. हाजरा यांनी सांगितल्याप्रमाणे, रेस्मेथ्रिन, सायपरमेथ्रिन आणि फेनव्हॅलेरेट सारखी काही कीटकनाशके दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण करू शकतात, ज्यात प्रजननामध्ये गुंतागुंत होणे, रोगप्रतिकारक क्षमता कमी होणे, त्वचेचा संसर्ग आणि अंत:स्राव होणे याचा समावेश आहे. महत्त्वाचं म्हणजे कमी प्रमाणात पण वर्षानुवर्षे जर या कीटकनाशकांचा आपल्या शरीरात प्रवेश होत राहिला तरी वरील त्रास होऊ शकतात.

# "भाजपाला ४०० पार व्हायचे असेल तर पाकिस्तान, अफगाणिस्तान"

## तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांचा टोला

**हैंदराबाद :** लोकसभा निवडणुकीत ४०० हून अधिक जागा मिळविण्यासाठी भाजपाने यंदा 'अब की बार ४०० पार', असा नारा दिला आहे. पण हा नारा व्हॉट्सॲप विद्यापीठासाठी चांगला आहे. पण प्रत्यक्षात एवढ्या जागा मिळवणे भाजपाला शक्य होणार नाही, अशी टीका तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते रेवंत रेड्डी यांनी केली आहे. टाइम्स नाऊ या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये बोलत असताना रेवंत रेड्डी यांनी भाजपावर जोरदार टीका केली. तसेच भाजपाला जर ४०० हून अधिक जागा मिळवायच्या असतील तर शेजारच्या बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्येही त्यांना निवडणूक लढवावी लागेल, असा टोला लगावला.

४०० पार जाणे हे भाजपासाठी दिवास्वप्न कसे ठरू शकते, याचेही विषण रेवंत रेड्डी यांनी केले. ते म्हणाले, "भाजपाने राजस्थानमधील सर्व २५ जागा, गुजरातमधील २६, हरियाणातील १०, दिल्लीमधील ७, बिहारमध्ये ३९ किंवा ४०, उत्तर प्रदेशमध्ये ६२, पश्चिम बंगालमध्ये १८ आणि उत्तर भारतातील इतर ठिकाणांहून ८० ते १०० टक्के जागा जिंकल्या तरी ते ३०० च्या आसपासच राहतात. तर दक्षिण भारतातील राज्यात १३० लोकसभा मतदारसंघ आहेत. याठिकाणाहून भाजपाला १५ पेक्षा अधिक जागा मिळणार नाहीत. त्यामुळे ४०० पार जायचे असेल तर भाजपाला शेजारच्या बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये काही जागा जिंकाव्या लागतील."

**काँग्रेसला किती जागा मिळणार?**

भाजपा किती जागा 0जिंकणार? याबाबतचे विषण रेवंत रेड्डी यांनी केल्यानंतर त्यांना काँग्रेस किती जागा जिंकणार याबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना ते म्हणाले, "काँग्रेस पक्ष हा इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष आहे. इंडिया आघाडीला २७० हून अधिक जागा मिळतील. तेलंगणामधील १४ जागा काँग्रेसला मिळतील. तसेच केरळमध्ये सर्वच्या सर्व २० जागा आम्ही जिंकू. तमिळनाडू आणि पुद्दुचेरीमधून आम्ही ४० जागा जिंकू. कर्नाटकमध्ये काँग्रेसला एकूण जागांच्या अर्ध्या जागा मिळतील."

मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी काही दिवसांपूर्वी तेलंगणात भारत राष्ट्र समिती आणि भाजपाची लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने संगनमत झाले असल्याचा आरोप केला होता.

# झारसुगुडा बोट अपघात: ओडिशात बोट उलटून सात प्रवाशांचा मृत्यू, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

**भुवनेश्वर :** ओडिशामधील झारसुगुडा इथल्या महानदीत बोट उलटून ७ नागरिकांचा मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या नावेत ५० प्रवासी अंबावोना इथून पाथरसेनीला जात होते. यावेळी हा अपघात घडला. मच्छिमारांनी ४० ते ४५ नागरिकांना जीवदान दिल्यानं या दुर्घटनेत मोठी जीवितहानी झाली नाही. काही प्रवासी अद्यापही बेपत्ता असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. बचाव पथकाने सात प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढले असून इतर बेपत्ता प्रवाशांचा शोध घेण्यात येत आहे.

नाव उलटून सात प्रवाशांचा मृत्यू : झारसुगुडा इथल्या महानदीत बोट उलटून मोठा अपघात झाला आहे. महानदीतून पाथरसेनीला जाणाऱ्या प्रवाशांची बोट महानदीत उलटली. या नावेतून ५० पेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करत होते. बोट उलटल्यानं तब्बल सात प्रवाशांचा बळी गेला आहे. बोट उलटून प्रवाशांचा मृत्यू झाल्यानं घटनास्थळावर नागरिकांचा मोठा आक्रोश झाला.

मुख्यमंर्त्यानी केला शोक व्यक्त : झारसुगुडा इथं घडलेल्या अपघातात सात नागरिकांचा मृत्यू झाल्यानं मोठी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी शोक व्यक्त केला. त्यांनी झारसुगुडा अपघातात मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना ४ लाख रुपयाची मदत जाहीर केली. यासह त्यांनी बचावकार्याला गती देण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

बेपत्ता नागरिकांचा घेण्यात येत आहे शोध : बोट उलटून झालेल्या अपघातात अद्यापही काही नागरिक बेपत्ता आहेत. या बेपत्ता नागरिकांचा महानदीत बचाव पथकांकडून शोध घेण्यात येत आहे. बचाव पथकातील रक्षकांकडून अत्याधुनिक कॅमेऱ्यांच्या मदतीनं पाण्याखाली बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यात येत आहे. त्यामुळे बेपत्ता नागरिकांना लवकरच शोधून काढण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात येत आहे.

# बंगळुरुमध्ये नायजेरियन नागरिकांचा पोलिसांवर हल्ला; ८ परदेशी नागरिकांना अटक

**बेंगळुरु :** केंद्रीय गुन्हे शाखा (सीसीबी) ने पोलिसांवर हल्ला करणाऱ्या नायजेरियन गुंडांना सीसीबी पोलिसांनी अटक केलीय. राजनकुंटेजवळ सुमारे आठ नायजेरियन गुंडांना अटक करण्यात आलीय. हल्ला करणाऱ्या गुंडांना पकडण्यासाठी सीसीबी पोलिसांसह डिस्वाट फोर्स तैनात करण्यात आले होते. डिस्वाट आणि सीसीबी पोलिसांनी शुक्रवारी संध्याकाळी कारवाई करत ८ जणांना अटक केलीय.

प्रकरणाची पार्श्वभूमी काय : अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर आफ्रिकन नागरिकांनी हल्ला केल्याची घटना गुरुवारी रात्री उशिरा बेंगळुरु ग्रामीण भागातील राजनुकुंटे पोलीस स्टेशन अंतर्गत मावल्लीपुरा इथं घडली होती. याठिकाणी सीसीबीचे निरीक्षक सुब्रह्मण्यस्वामी यांच्यासह पाचहून अधिक कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली होती. मावल्लीपुरा येथील एका घरात अंमली पदार्थाचं सेवन आणि साठा असल्याची माहिती मिळवणाऱ्या सीसीबी पोलिसांच्या पथकानं रात्री उशिरा कारवाई केली होती.

आरोपींचा पोलिसांवरच हल्ला : त्यांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता दोघांनी त्यांच्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली. आरोपींनी त्यांच्या साथीदारांना बोलावलं आणि इतर चार जण त्यांच्यासोबत सामील झाले. सहाही आरोपींनी घरातून पळून गेलेल्या पोलिसांवर हल्ला करण्यास सुरुवात केली.

पोलीस पळून जात असताना आरोपींनी त्यांच्या गाडीचे नुकसान केले.यानंतर सीसीबी पोलीस कर्मचाऱ्यांनी तत्काळ पोलीस हेल्पलाइनवर फोन केला.